


पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २२० ■ मंगळवार, दि. १७ फेब्रुवारी २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६
RNI No.- MAHMAR/2012/49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com




# अजित पवारांच्या विमान अपघाताबाबत शक्यता खरी होताना दिसतेय – रोहित पवार



प्रतिनिधी १७ फेब्रुवारी

**मुंबई:** दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत एक महत्वाची माहिती समोर आली आहे. अजित पवारांच्या



विमान अपघाताबाबत पहिल्यांदाच विमान अपघात तपास ब्युरोकडून अधिकृत स्पष्टीकरण दिलं आहे. विमानातील दोन्ही रेकॉर्डरवर उच्च तापमानाचा (आगीचा) दुष्परिणाम झाला आहे. विमानातील दोन्ही रेकॉर्डर जास्त वेळ आगीत राहिल्यामुळे त्यावर गंभीर परिणाम झाल्याचं विमान अपघात तपास ब्युरोकडून सांगण्यात आलं आहे. अजितदादांची किंमत सर्वसामान्य नागरिकांना समजली पण अजून तपास यंत्रणांना मात्र समजलेली दिसत नाही. दुर्दैवी अपघातानंतर २० दिवस झाले पण अजूनही तपासाला वेग आला नाही, असं राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार म्हणाले. तसेच केवळ व्हीएसआर कंपनीला पुरावे नष्ट करता यावे म्हणून तर उशीर होत नाही ना? की कंपनीला कुणाचा वरदहस्त आहे, हा प्रश्न सामान्य नागरिकांना पडला आहे, असंही रोहित पवारांनी सांगितले. आज ब्लॅक बॉक्स खराब झाल्याबाबत जी काही माहिती समोर येत आहे त्यावरून मी ५ दिवसांपूर्वी वर्तवलेली शक्यता खरी होताना दिसत आहे. असो, आम्ही मात्र अजितदादांचा अपघात की घात याचे उत्तर मिळवल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही, असं रोहित पवार म्हणाले. अजित पवारांच्या विमान अपघाताबाबत पहिल्यांदाच अधिकृत स्पष्टीकरण देण्यात आलं आहे. विमान अपघात तपास ब्युरोकडून निवेदन जारी करण्यात आलं आहे. अजित पवारांच्या विमानात दोन रेकॉर्डर होते. हे बराच वेळ आगीत जळाल्यामुळे रेकॉर्डरला नुकसान झालं आहे. त्यापैकी ७३ संभाषणाचा डेटा मिळवण्यात ब्युरोला यश मिळालं आहे. कॉकपीट व्हॉईस रेकॉर्डरवर सखोल तांत्रिक तपास सुरू आहे. कॉकपिट व्हॉईस रेकॉर्डर हनीवेल कंपनीनिर्मित असून संबंधित देशातील अधिस्वीकृत प्रतिनिधींची मदत मागितलेली आहे. तर्क वितर्क लावण्याऐवजी तपास प्रक्रियेवर विश्वास ठेवण्याचे आवाहन विमान अपघात तपास ब्युरोकडून करण्यात आले आहे. ब्युरो इंटरनॅशनल स्टँडर्डनुसार पुरावेनिष्ठ तपास करत अशल्याचं सांगण्यात आलं आहे.

### अजित पवारांचा विमान अपघातामध्ये मृत्यू

- अजित पवार यांचं विमान अपघातामध्ये निधन झालं. २८ जानेवारीला अजित पवार खाजगी विमानानेसकाळी मुंबईहून बारामतीकडे रवाना झाले होते. यावेळी बारामती विमानतळावर लँडिंगदरम्यान विमानाचा अपघात झाला होता. यामध्ये अजित पवारांसह ५ जणांचा मृत्यू झाला. अजित पवारांच्या अकाली मृत्यूमुळे राज्याच्या सर्वच स्तरात दुःखाची लाट उसळली. लाखो चाहते, समर्थक, सर्वपक्षीय नेते यांच्या उपस्थितीत २९ जानेवारीला अजित पवारांवर बारामतीच्या विद्या प्रतिष्ठानच्या मैदानात अंत्यसंस्कार करण्यात आले.

# ८ वर्षांच्या चिमुकलीवर २४ वर्षीय नराधमाचा अत्याचार

प्रतिनिधी १७ फेब्रुवारी

**अकोला** : मानवतेला काळीमा फासणारी एक घटना अकोट फैल पोलिस स्टेशनच्या हद्दी घडली आहे. या घटनेचा समाजाच्या सर्व स्तरातून संताप व्यक्त होत आहे. या परिसरातील एका ८ वर्षांच्या चिमुकलीवर एका २४ वर्षीय इसमाने अत्याचार केला आहे. काल घडलेल्या या घटनेचे गांभीर्य पाहून पोलिसांनी आरोपीला तातडीने अटक केली आहे.

### अकोट फैल पोलिस स्टेशन हद्दीतील घटना

प्राप्त माहितीनुसार अकोट फैल पोलिस स्टेशन परिसरात एक गरीब कुटुंब राहत असून, पती-पत्नीच्या वादानंतर आई आपल्या तीन मुलींसह वेगळी राहत होती. दरम्यान तिची ओळख आरोपी सोहेल खान जमीर खान (२४) याच्याशी झाल्याने त्याचे घरी येणे-जाणे होते. याचाच फायदा घेत त्याने आठ वर्षीय मुलीवर वाईट नजर ठेवली. तसेच काल सोमवारी घरी कोणी नसल्याचा फायदा घेत आठ वर्षीय मुलीशी अश्लिल चाळे करीत लैंगिक अत्याचार केला. या प्रकारामुळे घाबरलेल्या चिमुकलीने ही सर्व घटना आपल्या वडिलांना सांगताच त्यांच्या पायाखालची जमीनच सरकली. या घृणास्पद व माणूसकीला काळीमा फासणाऱ्या घटनेची पीडितेच्या वडिलांनी विश्व हिंदू परिषदेच्या पदाधिकाऱ्यांना माहिती देत मदतीची मागणी केली. त्यांनी घटनेचे गांभीर्य ओळखून ताबडतोब अकोट फैल पोलिस स्टेशनवर जात तक्रार दाखल केली. तसेच ठाणेदार रहीम शेख यांनीही घटनेची गंभीर दखल घेत तातडीने आरोपी सोहेल खान जमीर खान याला अटक करीत त्याच्यावर विविध कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या घटनेमुळे समाजमन संतप्त झाले असून सर्वत्र खळबळ उडाली आहे.

# सभापती पदासाठी ज्येष्ठ नेते विजय अग्रवाल यांचे नाव चर्चेत

**अकोला महानगरपालिका १६ सदस्यीय स्थायी समितीचे गठन सत्ताधारी शहर सुधार आघाडीचे वर्चस्व, भाजपची जुन्यांना संधी**

प्रतिनिधी १७ फेब्रुवारी

**अकोला** : अकोला महानगरपालिकेच्या राजकारणात अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या १६ सदस्यीय स्थायी समितीची घोषणा सोमवारी करण्यात आली आहे. महापालिकेच्या तिजोरीच्या चाब्या ज्या समितीच्या हातात असतात, त्या स्थायी समितीत सत्ताधारी शहर सुधार आघाडी ने ९ सदस्यांसह आपले निर्विवाद वर्चस्व कायम राखले आहे. स्थायी समिती सभापती पदासाठी भाजपचे ज्येष्ठ



नेते विजय अग्रवाल यांचे नाव आघाडीवर असून ते प्रमुख दावेदार आहे. त्यांचा अनुभव आणि राजकीय समीकरण जुळविण्यात त्यांनी केलेले प्रयत्न पाहता तेच या पदासाठी प्रमुख दावेदार ठरतील.

सोमवारी महापालिकेच्या आमसभेत गटनेत्यांनी दिलेल्या नावांचे वाचन करण्यात आले. महापालिकेतील ८० नगरसेवकांपैकी सोळा सदस्यांची स्थायी समितीत नियुक्ती करण्यात आली. नव्याने नियुक्त करण्यात आलेल्या सदस्यांमध्ये सर्वपक्षीय प्रतिनिधींचा समावेश असून, संख्याबळानुसार विविध आघाड्या आणि पक्षांना स्थान देण्यात आले आहे. अपक्ष नगरसेवक आशिष पवित्रकार यांना पक्षीय संख्याबळ नसल्याने संधी मिळाली नाही आणि ते स्थायी समितीत जाणार पण नसल्याचे चित्र आहे.

सत्ताधारी शहर सुधार आघाडीकडून सर्वाधिक ९ नगरसेवकांची वर्णी लागली आहे. यामध्ये विजय अग्रवाल, हरीश अलीमचंदाणी, सिद्धार्थ उपर्वट, योगिता पावसाळे, शरद तुरकर, मंजुषा शेळके, विनोद मापारी, नर्गिस परवीन फय्याज खान आणि पल्लवी मोरे यांचा समावेश होता. तर काँग्रेसच्या २१ सदस्यांपैकी चौघांना संधी मिळाली यात विरोधी बाकांवरील काँग्रेसच्या सुवर्णरेखा विजय जाधव, आझाद खान अलीयार खान, मो. फजलू अब्दुल करीम, शाहीन अंजुम मेहबुब शेख यांचा समावेश आ हे. तर शिवसेना (उबाठा), वंचित बहुजन आघाडी आणि एमआयएम यांना प्रत्येकी एक जागा मिळाली आहे. नगरसेवक संख्याबळावर स्थायी समितीत शिवसेना उबाठा गटाचे सागर भारुका, वंचित चे निलेश देव आणि एम आय एम चे सैय्यद रहिम सैय्यद हाशम यांचा स्थायी समितीत प्रवेश झाला आहे. स्थायी समिती सभापती पदावर भाजप चे ज्येष्ठ नेते विजय अग्रवाल हेच शहर सुधार आघाडीचे प्रमुख दावेदार आहे. स्थायी समितीच्या १६ सदस्यांची नियुक्ती पूर्ण झाल्यामुळे आता सर्वांचे लक्ष सभापती पदाच्या निवडीकडे लागले आहे. महापालिकेच्या अर्थसंकल्पावर आणि विकासकामांच्या निविदांवर या समितीचे नियंत्रण असल्याने, सभापती पदासाठी शहर सुधार आघाडीतील नेत्यांमध्ये मोठी चुरस पाहायला मिळण्याची शक्यता आहे.

# रोहित शेट्टीच्या घरावरील गोळीबारचा प्लॅन प्रवीणने तुरूंगातून रचला?

प्रतिनिधी १७ फेब्रुवारी

**मुंबई** : दिग्दर्शक रोहित शेट्टीच्या इमारतीबाहेर गोळीबाराच्या प्रकरणाच्या तपासाला नवे वळण मिळाले आहे. गोळीबाराचा हा कट तुरुंगातून रचला गेल्याचा पोलिसांना संशय आहे. फरार आरोपी शुभम लोणकरचा भाऊ प्रवीण लोणकरने तुरुंगातून हा सगळा कट रचल्याचा संशय पोलिसांना आहे. प्रवीण लोणकर सध्या बाबा सिद्दीकी हत्या प्रकरणात न्यायालयीन कोठडीत असून पोलिसांच्या मते त्याने तुरुंगात राहूनच शस्त्रे आणि पैशांची व्यवस्था केली, अशी धक्कादायक माहिती समोर येत आहे. या प्रकरणात मुख्य शूटरसह आतापर्यंत १२ आरोपींना पुणे, हरियाणा आणि उत्तर प्रदेश येथून अटक करण्यात आली आहे.

प्रवीण लोणकर आधीपासून जेलमध्ये असल्याने त्याला या प्रकरणात औपचारिक अटक करून रिमांडवर घेण्याची तयारी पोलिसांकडून सुरू आहे. पोलीस सूत्रांच्या माहितीनुसार घटनेत वापरलेली मोटारसायकल, पिस्तूल आणि फंडिंगची व्यवस्था प्रवीण लोणकरच्या इशाऱ्यावर करण्यात आली होती. तुरुंगात राहून त्याने हे ऑपरेशन कसे चालवले, यावर तपास सुरू आहे. या हाय-प्रोफाइल गोळीबाराच्या घटनेत मुंबई पोलिसांनी मकोका लावला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २० जानेवारी रोजी आरोपी सिद्धार्थ येनपुरे आणि समर्थ यांनी पुण्याहून मुंबईला एक दुचाकी आणली आणि ती मुंबईतील विलेपार्ले रेल्वे स्थानकाबाहेर पार्क केली. हीच दुचाकी गोळीबार करणाऱ्याने वापरल्याचा आरोप आहे. गोळीबार करणारा आरोपी हा मूळचा बिहारचा रहिवासी असून चार ते पाच साथीदारांसह तो मुंबईत राहिला होता. घटनेपूर्वी त्याने रोहित शेट्टीच्या घराची तीन ते चार वेळा पाहणी केली होती, असेही म्हटले जात आहे.

# मंत्रिपदावरून काढण्याचा निर्णय मुख्यमंत्री घेतील - नरहरी झिरवळ

प्रतिनिधी १७ फेब्रुवारी

**मुंबई** : राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांच्या अडचणीत मोठी वाढ झाली आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार या झिरवळ यांच्या कारभारावर प्रचंड नाराज असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. स्वतःची आणि पक्षाची प्रतिमा बदनाम होणार नाही, याची काळजी घ्या. तसेच प्रशासन आणि अधिकारी बदनाम होणार नाही, याविषयी खबरदारी घ्या, अशा सूचना सुनेत्रा पवार यांनी नरहरी झिरवळ यांना केल्याचे सांगितले जाते. तर दुसरीकडे झिरवळ यांच्या राजीनाम्याची मागणी होत आहे. झिरवळ यांनी यावर खुलासा केला आहे की, 'माझ्या राजीनाम्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेच घेतील. कुणाला मंत्रिपद द्यावे आणि काढावे, हा मुख्यमंत्र्यांचा अधिकार आहे. त्यामुळे सर्व निर्णय ते घेतील. बाकी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षात माझे कोणीही वैरी नाहीत', अशी भूमिका झिरवळ यांनी मांडली आहे.

# नरनाळा महोत्सवाचा दुसरा दिवस रसिकांच्या अभूतपूर्व प्रतिसादाने संस्मरणीय

प्रतिनिधी १७ फेब्रुवारी

**अकोला :** नरनाळा महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी 'शिवशंभू गर्जना' या कार्यक्रमाने महाराष्ट्राचा गौरवशाली इतिहास जागवला. वीररसपूर्ण गाणी आणि प्रभावी सादरीकरणाने रसिकांमध्येही उत्साह, जोश संचारला. उपस्थितांनीही दोन्ही हात उंचावून, उभे राहून कलावंतांच्या सुरात सूर मिसळून, स्वतः नाचून गाऊन जोरदार दाद दिली.

पहिल्या सत्रात निसर्गाधारित पर्यटन उपक्रम, 'मॅराथॉन– एक धाव संवर्धनासाठी', चित्रकला स्पर्धा, पाक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. सायंकाळच्या सत्रात अभिजित व अमू जाधव यांचा 'शिवशंभू गर्जना', त्यानंतर आयडॉल विनर सलमान अली यांची लाईव्ह कॉन्सर्ट हा कार्यक्रम झाला. आमदार वसंत खंडेलवाल, माजी आमदार संजय गावंडे, जिल्हाधिकारी वर्षा मीना, अपर आयुक्त सूरज वाघमारे, उपवनसंरक्षक राहुलसिंह टोलिया, निवासी उपजिल्हाधिकारी गजेंद्र मालठाणे, उपविभागीय अधिकारी मनोज लोणारकर आदी उपस्थित होते. मान्यवरांच्या उपस्थितीत स्पर्धेचे बक्षीस वितरण व कलावंतांचा गौरव झाला.

### ♦ 'शिवशंभू गर्जना'ने सूर तालातून जिवंत केली महाराष्ट्रीय संस्कृती व गौरवशाली इतिहास



अभिजीत जाधव यांनी 'शिवशंभू गर्जना' कार्यक्रमात एकापेक्षा एक सुंदर गाणी करून रसिकांना जिंकून घेतले. कार्यक्रमाला रसिकांची मोठी गर्दी होती. महाराष्ट्राचा गौरवशाली इतिहास, संस्कृती, मराठमोळी परंपरा, येथील लोकगीते यांची गुंफण असलेला हा कार्यक्रम मोठी दाद मिळवणारा ठरला. प्रत्येक गाण्यावर हजारो उपस्थित रसिक गायकांच्या सुरात सूर मिसळून तालावर नाचत–गात होते. अभिजीतच्या भारदस्त आवाजाने आणि रसिकांच्या अभूतपूर्व प्रतिसादाने आसमंत निनादून गेले होते. नरनाळा महोत्सवात इंडियन आयडल विनर सलमान अली लाईव्ह कॉन्सर्टने एकाहून एक सरस अशा सुमधुर गाण्यांची बरसात केली.

अजय अतुल यांचे 'देवा श्री गणेशा' हे गाणे गाऊन सलमानने कार्यक्रमाची दमदार सुरुवात केली. त्यानंतर 'मेरे रश्के कमर', 'तेरी दिवानी' बरोबरच चित्रपटांचा संगीतमय प्रवास विशद करणारी जुनी व नव्वदच्या दशकातील अनेक सुंदर गाणी सादर केली. यावेळी रसिकांमध्ये जाऊन सलमान अलीने गाण्यांमध्ये सर्वांना सहभागी करून घेतले. रसिकांनीही नाचून गाऊन त्याला साथ दिली. सुमधुर सुरावटीने आसमंत निनादून गेले होते. या संगीतमय वातावरणाने तरुणांबरोबरच ज्येष्ठांनाही ठेका धरायला भाग पाडले. या सुरेल बरसातीत सर्व उपस्थित न्हाऊन निघाले. मंगळवारी सकाळी १० वाजता कवीसंमेलन, दुपारी २ वाजता इन्व्हेस्टर्स मीट व सायंकाळी ७ वाजता प्रसिद्ध गायक पद्मश्री कैलास खेर यांची लाईव्ह कॉन्सर्ट होणार आहे.

# सोन्या–चांदीच्या दरात घसरण!

प्रतिनिधी १७ फेब्रुवारी

**मुंबई** : सध्या लग्नसराईचा मौसम असल्याने अनेकांना दागिन्यांच्या खरेदीचे वेध लागले आहेत, मात्र वाढत्या किंमतीमुळे दागिना घ्यायचा विचार सतत पुढे ढकलावा लागतोय. घसरण सुरूच आहे आणि हे मौल्यवान धातू दररोज स्वस्त होत आहेत. सोमवारी झालेल्या लक्षणीय घसरणीनंतर, मंगळवारी चांदीच्या किमतीत घसरण झाली. मल्टी कमोडिटी एक्सचेंज उघडताच चांदीच्या किमती ४ हजार ६०० रुपयांपेक्षा जास्त घसरल्या. एवढंच नव्हे तर चकाकणारं सोनही खाली घसरून उतरले आहे. आता चांदी त्याच्या हाय लेव्हलपासून १.८० लाख रुपयांनी स्वस्त होत आहे, तर सोनंही तब्बल ३८ हजारांनी स्वस्त झाले आहे. गेल्या काही दिवसांतच, चांदीचा बुडबुडा फुटल्यासारखे दिसते. २९ जानेवारी रोजी चांदीचा भाव पहिल्यांदाच ४ लाख रुपये प्रति किलो ओलांडून ४,२०,०४८ च्या लाईफ टाईम हाय लेव्हलवर पोहोचला. आज बाजार उघडताच चांदीचे दर २,३५,२०६ रुपयांवर पोहोचले. त्या हिशेबाने झटक्यातच १ किलो चांदीचे भाव ४,६८५ रु. कमी झाले.




# सीबीएसई दहावीच्या परीक्षेला उत्साहात प्रारंभ

प्रतिनिधी १७ फेब्रुवारी

**अकोला** : जिल्ह्यात मंगळवार, १७ फेब्रुवारीपासून सीबीएसई दहावीच्या परीक्षेला सुरूवात झाली. या परीक्षेसाठी अकोटमधील एक आणि अकोला शहरातील चार असे पाच परीक्षा केंद्र असून, १५०० वर विद्यार्थी परीक्षेला प्रविष्ठ झाले आहेत. गणिताच्या पेपरने परीक्षेला सुरूवात झाली असून, संपूर्ण परीक्षा शांततेच्या वातावरणात सुरू होती. जिल्ह्यात दहावी, बारावीच्या परीक्षांना सुरूवात झाली असून, त्या कॉपीमुक्त व्हाव्या, यासाठी शिक्षण विभाग सर्वतोपरी प्रयत्न करीत आहेत. मंगळवार सकाळी ११ वाजतापासून दहावी (सीबीएसई)च्या परीक्षेला प्रारंभ झाला.



सिटी न्यूज अमरावती

मंगळवार, दि. १७ फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## महिलेची दीड कोटींची फसवणूक; बांधकाम व्यावसायिक असल्याचे सांगून विश्वासघात

**अमरावती :** स्वतःला मोठा बांधकाम व्यावसायिक असल्याचे भासवून एका ५२ वर्षीय महिलेला गुंतवणूक व भागीदारीच्या नावाखाली तब्बल १ कोटी ५१ लाख रुपयांची फसवणूक झाल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी राजापेठ पोलीस यांनी गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, श्रीकांत हरिशचंद्र कलंत्री (वय ४०) यांनी स्वतःला मोठा बिल्डर असल्याचे सांगून महिलेचा विश्वास जिंकला. बांधकाम सुरू असलेल्या मॉलमध्ये ५० टक्के भागीदारी देण्याचे तसेच इमारतीत गुंतवणुकीची संधी असल्याचे आमिष दाखवले. यावर विश्वास ठेवून महिलेने आणि तिच्या आईने वेळोवेळी मोठी रक्कम दिली. नंतर पैसे परत मागितल्यावर आरोपीने टाळाटाळ केली व पैसे देण्यास नकार दिला. तक्रारीनुसार, त्याने जीवे मारण्याची धमकीही दिल्याचे सांगितले जाते. काही दिवसांपूर्वी महिला पोलिसांकडे तक्रार घेऊन गेल्यानंतर चौकशी सुरू झाली. चौकशीनंतर पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा दाखल केला असून संबंधित कायद्यांनुसार पुढील तपास सुरू आहे.

# स्व.दादासाहेब काळमेघ स्मृती जीवनगौरव पुरस्काराने प्रकाश पोहरे सन्मानित

♦ विलास बडे यांना स्व.जुगल किशोर अग्रवाल स्मृती राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार प्रदान ♦ वसंतराव घुईखेडकर, प्रवीण आहुजा, चंद्रकांत भड यांना उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार

प्रतिनिधी १७ फेब्रुवारी



**अमरावती:** अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या वतीने दरवर्षी दिल्या जाणाऱ्या विविध पत्रकारिता पुरस्कारांचा वितरण सोहळा शनिवारी थाटात पार पडला. स्व.दादासाहेब काळमेघ यांच्या स्मृती प्रित्यर्थ दिला जाणारा राज्यस्तरीय पत्रकारिता जीवनगौरव पुरस्कार देऊन दैनिक देशोन्नतीचे संपादक तथा शेतकरी चळवळीतील अग्रणी प्रकाश पोहरे यांना मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यासोबतच स्व.जुगलकिशोर अग्रवाल स्मृती राज्यस्तरीय पुरस्काराने न्यूज १८ मराठीचे संपादक विलास बडे यांना सन्मानित करण्यात आले. तसेच विभागस्तरीय आणि जिल्हास्तरीय पत्रकारिता पुरस्कार देखील वसंतराव घुईखेडकर, प्रवीण आहुजा आणि चंद्रकांत भड यांना या कार्यक्रमात प्रदान करण्यात आले.

श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या स्व. सोमेश्वर पुसदकर सभागृहात अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या वतीने पत्रकारित पुरस्कार सन्मान सोहळा पार पडला, यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष अनिल अग्रवाल होते. यावेळी कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून अमरावती लोकसभा मतदारसंघाचे खासदार बळवंत वानखडे, राज्यसभा खासदार डॉ.अनिल बोंडे, महापौर श्रीचंद तेजवानी, पोलिस आयुक्त राकेश ओला, सकाळ समुहाचे संपादक राहुल गडपाले, मराठी पत्रकार परिषदेचे माजी अध्यक्ष सिद्धार्थ शर्मा, अकोला जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष मिर शौकत अली, सत्कारमूर्ती दै.देशोन्नतीचे संपादक प्रकाश पोहरे, विलास बडे, वसंतराव घुईखेडकर, प्रवीण आहुजा, चंद्रकांत भड, यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमात स्व. दादासाहेब काळमेघ स्मृती राज्यस्तरीय पत्रकारिता जीवन गौरव पुरस्कार देऊन दैनिक देशोन्नतीचे संपादक प्रकाश पोहरे यांना प्रदान करण्यात आला. ४१ हजार रूपये रोख, शाल, श्रीफळ तसेच सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप होते. तर स्व. जुगलकिशोरजी अग्रवाल स्मृती राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार देऊन आयबीएन १८ मराठीचे संपादक विलास बडे यांचा सन्मान करण्यात आला. ३१ हजार रूपये रोख, शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप होते. यासोबतच राहुल गडपाले पुरस्कृत विभागीय पत्रकारिता पुरस्कार देऊन दै. नमो महाराष्ट्रचे संपादक वसंत घुईखेडकर यांचा सपत्नीक सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. २१ हजार रूपये रोख, शाल, श्रीफळ तसेच सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप होते. तसेच दै.विदर्भ मतदार पुरस्कृत जिल्हास्तरीय शहर पत्रकारिता पुरस्कार दै. प्रतिदिन अखबारचे वृत्त संपादक प्रवीण आहुजा तसेच पी.आर.पोटे एज्यकेशनल गृप पुरस्कृत जिल्हा ग्रामीण पत्रकारिता पुरस्कार देऊन दै. मातृभूमीचे चंद्रकांत भड यांचा सन्मान करण्यात आला. ११ हजार हजार रूपये रोख, शाल, श्रीफळ तसेच सन्मानचिन्ह असे या दोन्ही पुरस्काराचे स्वरूप होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा मराठी पत्रकार संघाचे उपाध्यक्ष संजय शेंडे यांनी सुत्रसंचालन सरचिटणीस प्रफुल्ल घवळे यांनी तर आभार प्रदर्शन प्रसिद्धी प्रमुख गौरव इंगळे यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सरचिटणीस प्रफुल्ल घवळे, सुधीर भारती, उपाध्यक्ष उल्हास मराठे, चंदू सोजातिया, संजय शेंडे, अरूण जोशी, अनुप गाडगे, अरूण तिवारी, कोषाध्यक्ष विजय ओडे, सहकोषाध्यक्ष सूनील धर्माळे, सहसचिव प्रणय निर्वाण, संजय बनारसे, प्रसिद्धी प्रमुख गौरव इंगळे, ग्रामीण प्रतिनिधी हेमंत निखाडे, कार्यकारिणी सदस्य मंगेश तायडे, सुरेंद्र आकोडे, नितेश राऊत, अमर घटारे, स्वप्नील उमप, विजय धामोरीकर, छाया काळमेघ, स्वीकृत सदस्य डॉ.लोभस घडेकर, सूधीर केने, यशपाल वरठे, अशोक जोशी तसेच पत्रकार विवेक दोडके आणि प्रेम कारेगावकर कार्यालयीन व्यवस्थापक रोशन जोंधळे यांनी प्रयत्न केले. तसेच या कार्यक्रमाला जिल्हाभरातून शहर तसेच ग्रामीण भागातील पत्रकार बांधव, राजकीय तसेच सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर मंडळींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

**पत्रकारितेचा वारसा अमरावती शहरात जीवंत - वसंतराव घुईखेडकर**

अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघाचे काम कौतुकास्पद आहे. अमरावती शहराला पत्रकारितेचा मोठा वारसा असून तो वारसा कायम ठेवण्याचे काम आजही नवी पिढी करताना दिसून येत आहे. स्व.बाळासाहेब मराठे यांच्याकडून आम्हाला पत्रकारितेत प्रेरणा मिळाली. वृत्तपत्र चालविणे म्हणजे तारेवरची कसरत आहे. हे काम करणाऱ्यांचा संघर्ष समजून घेणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांचे सर्वसामान्यांचे प्रश्न ज्वलंतपणे मांडण्याचे काम आम्ही करतो आहे असे वसंतराव घुईखेडकर यांनी सांगितले.

## गाडगे नगर येथील ज्वेलर्सवर धाडसी दरोडा; ७ आरोपी ताब्यात

प्रतिनिधी १७ फेब्रुवारी



**अमरावती :** फिर्यादी यांचे सुमित्रा ज्वेलर्स नावाचे दुकान स्वावलंबी नगर पोटे कॉलेज रोडवर असुन ते दिनांक १३/०२/२०२६ रोजी दुकान रात्री ९.०० वा. दरम्यान दुकान बंद करून दुकानातील संपूर्ण मोण्याचे दागीणे व नगद रक्कम असे कापडी पिशवीमध्ये सेवन ती पिशवी त्याचे मोपेड गाडीचे डिक्कीमध्ये ठेवुन स्वतःचे घरी बालाजी नगर कठोरा रोड येथे जात असतांना पाठीमागुन एक काळपारंगाची फोरक्लिर गाडी आली त्या गाडीने फिर्यादी यांचे गाडीला धक्का देवुन लोटले वरून फिर्यादी थांबले असता त्या गाडीमधुन ०३ अनोळखी इसम बाहेर निघुन त्यापैकी एकाने फिर्यादीला चाकुचा धाक दाखवुन दोघांनी फिर्यादी जवळील गाडीची चाबी जबरीने घेवुन गाडीची डिक्की उघडुन डिक्कीत असलेले ४५९ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागीगी व १,७०,२०० रुपये नगदी रक्कम असा मुद्दे ?माल जबरीने चोरून नेला. अशा फिर्यादीचे रिपोर्ट वरून पो.स्टे. गाडगे नगर येथे अपराध कमांक १६२/२०२६ कलम ३०९(४), ३(५) भा.न्या.सं. प्रमाणे गुन्हा नोंद होता. फिर्यादी यांनी घटनेच्या दुसरे दिवशी सुमारे २४० ग्रॅम अधिक सोन्याचे दागीणे बोरी गेले असल्याचे बयाण दिले असल्याने सतर गुन्हयात सुमारे ७०० ग्रॅम सोन्याचे दागीणे चोरी गेले होते.

. पोलीस आयुक्त यांनी सदर गुन्हयाचे घटनास्थळी त्वरीत भेट देवून पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा यांना सदर गुन्हा उघडकीस आणने बाबत सुचना देवुन आदेशित केल्याने पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण गुन्हे शाखा यांनी सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवुन सदर गुन्हा उघड़किस आणने करीता ४ पथक तयार करून गुन्हा घडल्यापासून अहोरात्र आरोपीतांच्या शोधार्थ पथके रवाना करण्यात आली होती. पोलीस निरीक्षक गुन्हे शाखा यांचे नेतृत्वात गुन्हे शाखा येथिल पथकांनी सदर गुन्हयाचा समांतर तपास करीत असतांना सदरचा गुन्हा क्लीष्ट व गंभीर स्वरूपाचा आरोपी फिरोज खान कासम खान वय ३२ वर्ष रा. विस्मील्ला नगर लालखडी अमरावती, सैयद इम्रान सैयद मिर उर्फ दबंग वय ३२ वर्ष रा. लालखडी मदरसा जवळ अमरावती, शेख रिहावान उर्फ कालु अब्दुल रहेमान खान वय १९ वर्ष रा. हैदरपुरा अमरावती बडनेरा कलम ६७/२६ ३०९ (६), भा.न्या.सं सैयद इम्रान सैयद मिर उर्फ दबंग वय ३२ वर्ष रा. लालखडी मदरसा जवळ अमरावती, शेख रिझवान उर्फ कालु अब्दुल रहेमान खान वय १९ वर्ष रा. हैदरपुरा अमरावता, शेख इम्रान उर्फ इम्मु शेख रहेमान वय ३३ वर्ष रा. हबीब नगर नं.१ अमरावती ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपीचे नावे ,सैयद इम्रान सैयद मिर उर्फ दबंग वय ३२ वर्ष रा. लालखडी मदरसा जवळ अमरावती ,फिरोज खान कासम खान वय ३२ वर्ष रा. बिस्मील्ला नगर लालखडी अमरावती , शोएब खान अमीन खान वय २१ वर्ष रा. रहमत नगर अमरावती , शेख इम्रान उर्फ इम्मु शेख रहेमान वय ३३ वर्ष रा. हबीब नगर नं.१ अमरावती, शेख रिझवान उर्फ कालु अब्दुल रहेमान खान वय १९ वर्ष रा. हैदरपुरा अमरावती, शुभम उर्फ बंटी ज्ञानेश्वर खंडारे वय ३३ वर्ष रा. ग्राम कठोरा बु. अमरावती , सुरज सिध्दार्थ तायडे वय ३५ वर्ष रा. बोरगांव धर्माळे अमरावती यांना अटक करण्यात आली.

## महाशिवरात्री निमित्त तपोवनेश्वर येथे भव्य धार्मिक सोहळा

प्रतिनिधी १७ फेब्रुवारी



**अमरावती :** श्री क्षेत्र तपोवनेश्वर संस्थान यांच्या वतीने महाशिवरात्री निमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही मोठ्या उत्साहात धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सितारामगिरी महाराज यांच्या कृपाप्रसादाने हा महोत्सव साजरा होत असून भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

रविवार दिनांक १५ फेब्रुवारी २०२६ रोजी महाशिवरात्री निमित्त देवदर्शनाचा लाभ घेण्यासाठी भक्तांना विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. त्यानंतर सोमवार दिनांक १६ फेब्रुवारी २०२६ रोजी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी १०.३० वाजता काल्याचे कीर्तन, दुपारी १२.०० वाजता शोभायात्रा व दहीहंडी, तर दुपारी १.०० वाजता महाप्रसाद आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमासाठी अध्यक्ष अनिल भोजराजजी साहू, उपाध्यक्ष लछुराम झगडुजी पवार, सचिव निलेश महादेवरावजी कुबडे तसेच विश्वस्त रामचंद्र ठाकुरदासजी गुप्ता, राजेश पुजुरामजी आचलिया, रुपचंद हरिचंदजी खंडेलवाल, दिलीप बाबारावजी ठाकरे, रवि रमेशलालजी पंजाबी, प्रविण सुरेशरावजी सावळे, प्रमोद जयकुमारजी बंड, विठ्ठल जालमसिंगजी पवार आदींनी पुढाकार घेतला आहे.

## नगरसेवकाने थेट कचरा नगरपालिकेत नेला

प्रतिनिधी १७ फेब्रुवारी



**दर्यापूर :** नगरपरिषदेच्या वतीने शहरातील कचरा नियमित उचलला जात नसल्याने नगरसेवकाने कचरा उचलून कटलेट टाकला भेटतो कचरा नगरपरिषद मध्ये नेल्याने एकच खडबड उडाली आहे.

भाजपचे विरोधातील नगरसेवक रोशन कट्यारमल यांनी हे अनोखा आंदोलन करून प्रताप केला आहे. दर्यापूर नगरपरिषद मध्ये युवा कार्यक्षमता असलेले नगरसेवक रोशन कट्यारमल यांनी नगरपरिषद दर्यापूर येथे कचरा आणून टाकला.

प्रभागातील कचरा व थेट दिला नाल्या स्वच्छ न झाल्यास व कचरा न उचलल्यास ते रोज नगरपालिकेत आणून टाकणार असा इशाराही त्यांनी दिला . कचरा व नालीतील घाण रोज स्वच्छता व आरोग्य विभागाने साफ केलीच पाहिजे असे ते म्हणाले.

## दर्यापूर येथे मुद्रांक विभागामार्फत जनसंवाद कार्यक्रम संपन्न




**दर्यापूर :** तालुक्यातील दुय्यम निबंधक कार्यालय या ठिकाणी शुक्रवारी जनसंवाद,जनता दरबाराचे आयोजन करण्यात आले होते यावेळी मुद्रांक जिल्हाधिकारी अनिल औतकर,तहसीलदार डॉ. रवींद्र कानडजे, दुय्यम निबंधक अधिकारी एम एम पलीकोंडावार दस्त लेखक तसेच मुद्रांक विक्रेता राजेंद्र नागपुरे, संजय भारसाकळे यांची प्रमुख उपस्थित होती.

नुकतेच महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी गुद्रांक विभागाला केलेल्या सुचनांच्या अनुषंगाने जनसंवाद व जनता दरबाराचे आयोजन करण्यात आले. यावेळी मुद्रांक जिल्हाधिकारी अनिल औतकर यांनी दर्यापूर येथे झालेल्या कार्यक्रमात नागरिकांना मार्गदर्शन करतेवेळी जमीन तुकडे बंदी कायद्याविषयी मार्गदर्शन केले. यावेळी जणतादरबार मध्ये काही नागरिकांच्या समस्यांचे तात्काळ निराकरण सुद्धा करण्यात आले. नागरिकांनी विचारलेल्या प्रत्येक प्रश्नाचे समाधानकारक उत्तरे देऊन त्यांना योग्य मार्गदर्शन तसेच जनतेच्या समस्या सोडविणे आणि शासनातर्फे जी योजना राबवण्यात येत आहे या योजनेची माहिती सर्वसामान्य जनते पर्यंत पोहोचवणे हे आमचे कर्तव्य असून यापुढेही असे कार्यक्रम आयोजित करत राहू अशी ग्वाही मुद्रांक जिल्हाधिकारी अनिल औतकर यांनी यावेळी दिली. यावेळी दस्त लेखक व मुद्रांक विक्रेता उपस्थित झाले होते यात सुधीर गुल्हाने, मनोज तायडे, संजय नागपुरे, राजेंद्र गुल्हाने, राजन देशमुख, संजय गुल्हाने, विजय गवई, प्रफुल गुल्हाने, अरविंद टापरे, विनोद टापरे, भाष्कर मोरस्कर, शाम इताळ, गौरव देशमुख, नरेंद्र देशमुख, नानासाहेब गवई, संजय चोरे, गणेशराव गुल्हाने, संभाजी मिसाळ, शैलेश पचगाडे, तसेच पक्षकार व नागरिक उपस्थित होते.

## ना. एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त शिवछत्रपती शंकरपट येथे नवदांपत्यांनी केले रक्तदान




**दर्यापूर:** शिवसेना मुख्य नेते व उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांच्या ६२ व्या वाढदिवस निमित्ताने माजी जिल्हाप्रमुख शिवसेना अमरावती गोपाल पाटील अरबट यांनी आयोजित केलेल्या शिवछत्रपती शंकरपट मधील रक्तदान शिबिर मध्ये रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान या हेतूने नवदाम्पत्य संदीप वासुदेवराव अरबट व प्रगती संदीप अरबट यांनी रक्तदान करून रकदात्यासमोर एक आदर्श निर्माण केला या रक्तदान शिबीर चे संयोजक म्हणून गावच्या पोलीस पाटील अश्विनी अरबट ह्या होत्या विशेषत या रक्तदान शिबिरात एकूण ना. एकनाथ शिंदे यांच्या वाढत्या वयानुसार एकूण ६२ जणांनी रक्तदान केले त्यामध्ये कमलेश वानखडे, राम गावंडे, शिवशंकर अरबट, सुमित वडतकर, गणेश उमाळे, वृषांक वायझाडे, गणेश नागे, शिवा राऊत, पुरुषोत्तम अरबट, निलेश घाटे, दिनेश पांडे, ऋतिक कडू, शरद अरबट, श्याम अरबट, गोकुळ अरबट, रणजीत इंगळे, हेमंत हेमंत उमाळे सागर गेठे, अनिकेत पडघमोळ, मंगेश सांगोले, अविनाश अरबट अक्षय आठवले, प्रज्वल गुलहाने, शिवम सांगोले व इतर सहकाऱ्यांनी रक्तदान केले व सर्वांनी सर्वात श्रेष्ठ दान म्हणजे रक्तदान करावे असे आवाहन माजी जिल्हाप्रमुख शिवसेना अमरावती गोपाल पाटील अरबट व पोलीस पाटील अश्विनी अरबट यांनी केले आहे.

## मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या मध्य प्रदेश सीमेवरून डिंकाची आंतरराज्यीय तस्करी

♦ डिंकासाठी सालई झाडांवर कुऱ्हाडीचे घाव; केमिकलयुक्त इंजेक्शनमुळे झाडे सुकली

प्रतिनिधी १७ फेब्रुवारी



**धारणी:** मेळघाटातील जंगलावर आता तस्करांची वक्रदृष्टी पडलली आहे. मौल्यवान सालई वृक्षांची साल ओरबाडून त्यातून डिंक काढण्याचे अवैध सत्र मोठ्या प्रमाणावर सुरू असल्याचा प्रकार वन विभागाच्या सुसर्दा परिक्षेत्रात झालेल्या कारवाईत उघड झाला आहे. अधिक डिंक मिळवण्यासाठी चक्क केमिकलयुक्त इंजेक्शन टोचले जात असल्यामुळे मेळघाटातील सालईची झाडे वाळून नष्ट होण्याच्या मार्गावर असून, अकोट वन्यजीव विभागाच्या धूळघाट रेल्वे

रेंज आणि प्रादेशिक वन विभागाच्या मध्यप्रदेश सीमेवरील जंगलात जैवविविधतेला मोठा धोका निर्माण झाला आहे. धारणी तालुक्यातील मेळघाट प्रादेशिक वन विभाग तथा अकोट वन्यजीव विभागांतर्गत येणाऱ्या झिवाझिरी, हिराबंबई, राणीगाव, गोलाई, मोधाखेडा, सिनबंद, भादुबल्डा, धूळघाट रेल्वे, सुसर्दा, बारातांडा, बिरोटी, चेंडो, जामपाणी, पळसकुंडी आदी गावालगतच्या भागातील जंगल सध्या तस्करांच्या रडारवर आहे. त्यामुळे वन आणि व्याघ्र प्रकल्पाच्या अधिकाऱ्यांनी विशेष लक्ष देण्याची गरज आहे. तस्कर सालईच्या झाडांवर धारदार शस्त्रांनी करवा (खोडाची साल काढणे) करतात. झाडाला जखम केल्यानंतर त्यातून येणारा डिंक वाळल्यावर गोळा केला जातो. हा डिंक पोत्यांमध्ये भरून मध्य प्रदेशच्या सीमेवरून आंतरराज्यीय बाजारपेठेत पाठवला जातो.

## बुधवारी तालुकास्तरीय जनसंवाद व तक्रार निवारण कार्यक्रम

**अमरावती :** पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकाराने 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान' प्रभावीपणे राबवण्यात येत आहे. तसेच नागरिकांच्या समस्या निवारणासाठी बुधवार, दि. १८ फेब्रुवारी रोजी जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये 'तालुकास्तरीय जनसंवाद व तक्रार निवारण' कार्यक्रम होणार आहे. यात नागरिकांच्या समस्या गावातच ऐकून घेतल्या जाणार आहे.

या कार्यक्रमात नागरिकांच्या वैयक्तिक आणि सार्वजनिक तक्रारी, विविध विकास कामांची सद्यस्थिती, प्रलंबित प्रस्ताव आणि स्थानिक पातळीवरील महत्त्वाच्या प्रश्नांचा सविस्तर आढावा घेतला जाणार आहे. या दिवशी तहसील, जिल्हा परिषद, तसेच संबंधित तालुक्यातील सर्व विभागांचे अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी, ग्रामसचिव आणि कृषी सहाय्यक उपस्थित राहणार आहेत. प्रशासनाने तालुकास्तरीय जनसंवाद व तक्रार निवारण कार्यक्रमासाठी समन्वयक अधिकारी तालुकानिहाय जबाबदारी सोपवली आहे.

**जाहीर नोटीस**

सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, आमचे पक्षकार (१) हिना कौसर शेख करीम, (२) महेजबीन सैय्यद हैदर अली, (३) राना अफसर सैय्यद जुलफुकार अली, (४) नाहीद अकबर खान पठान, सर्व रा. अकोला, यांच्या मालकीची खालील वर्णनाची मिळकत असुन सदरहु

**मिळकतीचे वर्णन :-** मौजा मलकापुर ता.जि. अकोला येथील गट क. १९/२ क्षेत्रफळ ०.७०.८१ पोट खराब ०.५९ सामाईक क्षेत्रफळ हे आमचे पक्षकार व त्यांची आई व भाऊ यांच्या नावे शासकीय मालमत्ता पत्रक नमुना ७/१२ याच्या मध्ये आमच्या पक्षकाराचे वडील मोहम्मद जिना मोहम्मद युसुफ यांच्या वि. न्यायालय ३ रे सह व्यवहार न्यायाधिश (क.स्तर) अकोला यांनी आदेशित केलेले वारस प्रमाणपत्र केस क. एमजेसी ८४९/२०२४ निकाल ता. १२/०७/२०२४ प्रमाणे नोंद होवुन त्यांच्या मालकी हक्कात व ताब्यात सदरची मालमत्ता आहे, तसेच यात वारस प्रमाणपत्राच्या आधारे आमच्या पक्षकाराचे वडील मयत नामे मोहम्मद जिना मोहम्मद युसुफ यांच्या मालकीतील मौजा मलकापुर ता.जि. अकोला येथील गट क. २०/२ खाते क. ३५२३ क्षेत्रफळ ०.६९ पोट खराब ४.०८ मधील प्लॉट तसेच मौजा मलकापुर ता.जि. अकोला येथील गट क २१ मधील कृषक अर्धा एकर जमीन हयाच्या नोंदी अद्याप वारस प्रमाणपत्राच्या आदेशा प्रमाणे प्रलंबित असुन सदर मालमत्ते मध्ये आमच्या पक्षकाराचा सामुहिक वडीलोपार्जित हिस्सा असुन वि. न्यायालयाने दिलेल्या वारस प्रमाणपत्रा प्रमाणे संपूर्ण अधिकार आमच्या पक्षकाराचे आहे व त्या बाबतचे वारस प्रमाणपत्रा प्रमाणे ७/१२ ला नोंद करण्याकरिता शासकीय दप्तरी अर्ज प्रलंबित असुन त्यावर त्वरीत नोंद होण्याचा आदेश प्रलंबित आहे, असे असतांना सुध्दा आमच्या पक्षकाराचे भाऊ व आई नामे नजीरा बी मोहम्मद जीना व भाऊ नामे मोहम्मद साजीद मोहम्मद जीना, मोहम्मद आसीफ मोहम्मद जीना ही सदर मालमत्ता परस्पर विकीचे व्यवहार करण्याच्या बेतात असुन त्यांना सदर मालमत्ता आमच्या पक्षकाराच्या मालकी हक्कात असतांना सुध्दा विकण्याचा कोणताही कायदेशीर अधिकार नाही, असे असतांना सुध्दा ते लोकांची दिशाभुल करून बेकायदेशीररित्या सदर मालमत्ता विकण्याच्या तयारीत आहेत, तरी वरील मालमत्ते संबंधी कोणीही त्यांचेशी कोणत्याही प्रकारचा व्यवहार करू नये, केल्या असा व्यवहार आमचे पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही व होणाऱ्या खर्चास व परिणामास संबंधित व्यक्ति जबाबदार राहतील, याची नोंद घ्यावी.

**अकोला**
**दि.:९/०/२०२६**

**ॲड. प्रविण आर. कडाळे**
**३० सोनाई, तोष्णीवाल लेआउट**
**अकोला. मो.क्र. ९८५०३४३४७७**

**कार्यालय नगर परिषद तेल्हारा, जि. अकोला**

**स्वच्छता विभाग जाहिर ई- निविदा सूचना (दुसरी वेळ)**

मुख्याधिकारी नगर परिषद तेल्हारा जि. अकोलातर्फे याद्वारे जाहिर ई- निविदा सूचना आमंत्रित करण्यात येत आहे. कामाचे टेंडर **id 2026_DMA_1277975_1** आहे. सदर निविदेची अटी शर्ती व इतर सविस्तर माहिती **http://mahatenders.gov.in** या संकेत स्थळावर पहावयास उपलब्ध आहे.

**स्वा/ -**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, तेल्हारा**

# सिटी न्यूज अकोला

मंगळवार, दि. १७ फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com


## राणी सती धाम येथे अर्धनारीनटेश्वर झाकी

**अकोला:** स्थानीय राणी सती धाम येथे पावन महाशिवरात्री निमित्त अर्धनारीनटेश्वर झाकी साकार करण्यात आली. शिवलिंगाला अनेक साहित्यांच्या द्वारे सजविण्यात येऊन छपन्न भोग मांडण्यात आला.आतापर्यंत धाम मध्ये शिवभक्त व शिव संध्या आरती मंडळच्या सौ आकांक्षा



सागर पनपालिया यांनी अनेक झाक्या साकार केल्या होत्या. यावेळी धाम चे अध्यक्ष जगदीश प्रसाद बाछुका, कुंजबिहारी जाजू, माता सौ अनुसूया जाजू,अजय अग्रवाल,पवन केडीया यांनी पूजन केले. उपस्थिती मे शिव संध्या आरती मंडळ च्या पूजा जाजू, अनिता मुरारका,बबिता ठाकूर आदी उपस्थित होत्या.

## गुरुवार पासून पु.सुधांशुजी महाराज यांचा दिव्य सत्संग

**अकोला :** विश्व जागृती मिशन अकोलाच्या वतीने गुरुवार दि १९



फेब्रुवारी पासून स्थानीय गोरक्षण संस्था मैदानात नित्य सकाळी ९-३० ते सकाळी ११-३० व दु ४ ते साय ६-३० वाजेपर्यंत आयोजित पु.सुधांशुजी महाराज यांच्या दिव्य सत्संगची तयारी पूर्ण झाली आहे. सत्संगाचा प्रारंभ दि १९ फेब्रुवारी रोजी दु ३ वाजताआनंद सत्संग भवन येथून कथास्थळ पर्यंत निघणाऱ्या भव्य शोभायात्रेने होणार आहे.या नंतर दु ४ वाजता दिव्य सत्संग प्रारंभ होणार आहे.दि २० फेब्रुवारी ते दि २२ फेब्रुवारी पर्यंत सत्संगची वेळ नित्य सकाळी ९-३० ते सकाळी ११-३० व दु ४ ते साय ६-३० वाजेपर्यंत राहणार असून दि २१ फेब्रुवारी रोजी साय ६-३० वा कथास्थळी ढोल वादन होऊन या नंतर वारकरी संप्रदायचा पंढरपूरच्या धर्तीवर अश्व रिंगण सोहळा होणार आहे.रविवार दि २२ फेब्रुवारी रोजी सकाळी ११-३० वाजता सर्व भक्तांसाठी मंत्र दीक्षा कार्यक्रम होणार आहे.

## डॉ. अरुण भागवत यांचे निधन

**अकोला :** आरोग्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे डॉ. अरुण



भागवत यांचे निधन झाले. मनब्दासारख्या छोट्या गावातून वैद्यकीय क्षेत्रातील प्रवास सुरू करून अनेक रुग्णांच्या जटिल शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पाडल्या. गायगाव रोडवरील त्यांच्या शेतात अंत्यसंस्कार करण्यात आले. समाजातील मान्यवर, वैद्यकीय क्षेत्रातील सहकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निधन वार्ता

**दिनेश अग्रवाल**

**हिवरखेड (रुपराव):**



येथील धान्य व्यापारी अग्रसेन दिनेश उत्तमलाल अग्रवाल यांचे १६ फेब्रुवारीला आकस्मिक निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी सीमा, आणि दोन मुले भूषण आणि आनंद तसेच मोठा आप्तपरिवार आहे

## सोलापूरच्या ९ मगरी वान धरणात सोडल्याने नागरिकांमध्ये संताप

प्रतिनिधी १७ फेब्रुवारी

**तेल्हारा:** वनविभागाने सोलापूर येथून पकडलेल्या नऊ मगरी अकोला जिल्ह्यातील वाण धरणात सोडण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे परिसरातील नागरिक, तीर्थयात्री, पर्यटक तसेच शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून मोठा संताप व्यक्त होत आहे.

महाराष्ट्र व मध्य प्रदेशाच्या सीमेवरील अकोला, अमरावती आणि बुलढाणा जिल्ह्यांच्या सीमेवर वाण धरण आहे. या धरण परिसरात वारंवार भाविक व पर्यटकांची वर्दळ असते. जवळच बाळापूर तालुक्यातील प्रसिद्ध हनुमान सागर (बाण प्रकल्प) आहे. त्यामुळे धार्मिक तसेच पर्यटनदृष्ट्या हा भाग महत्त्वाचा मानला जातो. वनविभागाने सोलापूर परिसरातून पकडलेल्या नऊ मगरी वाण धरणात सोडल्याची माहिती समोर आली आहे. या धरणाच्या बॅक वॉटर परिसरात अनेक शेतकरी शेतीकामासाठी ये-जा करतात. तसेच मासेमारी करणारेही मोठ्या संख्येने येथे उपस्थित असतात. अशा परिस्थितीत मगरी सोडल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे की, यापूर्वीही या भागात मगरींचा त्रास झाल्याच्या घटना घडल्या आहेत. काही ठिकाणी मगरींनी जनावरांवर हल्ले केल्याच्या तक्रारी आहेत. त्यामुळे पुन्हा मगरी सोडण्याचा निर्णय चुकीचा असून तो तात्काळ मागे घ्यावा, अशी मागणी करण्यात येत आहे.

धार्मिक स्थळे, पर्यटनस्थळे आणि शेतजमिनी यांच्या जवळ मगरी सोडल्यास अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. विशेषतः पावसाळ्यात पाण्याची पातळी वाढल्यास मगरींचा वावर वाढतो, याकडेही नागरिकांनी लक्ष वेधले आहे. वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी मात्र सांगितले की, पर्यावरणीय संतुलन राखण्यासाठी आणि मगरींचे संरक्षण करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. योग्य ती काळजी घेण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. तथापि, स्थानिक ग्रामस्थ, शेतकरी आणि भाविकांनी या निर्णयाचा निषेध नोंदवून प्रशासनाने तातडीने पुनर्विचार करावा, अशी मागणी केली आहे.

## सेंट पॉल्स अकॅडमीत दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

वि. प्रतिनिधी १७ फेब्रुवारी

**अकोट:** सेंट पॉल्स अकॅडमी येथे दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे अध्यक्ष नवनीत लखोटीया प्रमुख अतिथी लुनकरण डागा, प्रमोद चांडक, रेखा चांडक, शारदा लखोटीया दीपम लखोटिया, अवनी लखोटिया, चंद्रकांत तिवारी यांनी मंचावर आपले स्थान ग्रहण केले .तसेच शाळेचे मुख्याध्यापक विजय बिहाडे उपमुख्याध्यापिका ममता श्रावगी, रिंकू अग्रवाल पर्यवेक्षक अभिजीत मेंढे, मालती महल्ले, सारिका रेडे यांची मंचावर उपस्थित लाभली.




कार्यक्रमाच्या सुरुवातीला पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर सरस्वती पूजन करून डॉ. अर्चना रायबोले योगेश चेडे व वर्ग सहावीच्या विद्यार्थ्यांनी स्वागत गीत सादर केले. कार्यक्रमांमध्ये अर्णवी भाजीपाले ,सई मेतकर, अवंती भांडे या विद्यार्थिनींनी आपले मनोगत व्यक्त केले. तसेच नवनीत लाखोटीया, प्रमोद चांडक, अवनी लखोटिया, चंद्रकांत तिवारी, विजय बिहाडे, अनिता सोनवणे यांनी विद्यार्थ्यांना भावी जीवन व परीक्षे करिता शुभेच्छा देऊन मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन जया लाडोळे यांनी तर आभार प्रदर्शन सृष्टी देशमुख यांनी केले.

## रमजान मुबारक – रहमत, बरकत आणि इंसानियतचा संदेश : जावेद जकरिया

प्रतिनिधी १७ फेब्रुवारी

**अकोला:** रमजानचा पवित्र महिना आपल्यासाठी आध्यात्मिक समाधान, संयम आणि तक्वाचा संदेश घेऊन येतो. हा महिना केवळ रोजा ठेवण्यापुरता मर्यादित नसून आपल्या स्वभावात सुधारणा करण्याचा, मन शुद्ध करण्याचा आणि अल्लाहची कृपा मिळवण्याचा महिना आहे असे कच्छी मशीद ट्रस्टचे अध्यक्ष जावेद जकरिया यांनी म्हटले आहे.

चंद्रदर्शनानुसार रमजानची सुरुवात होईल. जर १८ फेब्रुवारी रोजी चंद्रदर्शन झाले तर १९ फेब्रुवारीपासून रोजे सुरू होतील, आणि जर १९ फेब्रुवारी रोजी चंद्रदर्शन झाले तर २० फेब्रुवारीपासून रमजानची सुरुवात होईल. त्यामुळे सर्व बांधवांनी अधिकृत घोषणेनुसारच पालन करावे, अशी नम्र विनंती आहे.

रोजा आपल्याला भूक आणि तहान यांद्वारे समाजातील गरजू लोकांची जाणीव करून देतो. रमजान आपल्याला इबादतीसोबतच मानवता, बंधुता आणि परस्पर प्रेमाची शिकवण देतो. कुरआन पठण, नमाज अदा करणे, जकात आणि सदका देणे—ही या महिन्याची खरी आत्मा आहे.

आजच्या काळात समाजाला सौहार्द आणि ऐक्याची गरज आहे. रमजान आपल्याला धर्म, जात आणि पंथ यापलीकडे जाऊन एकमेकांना साथ देण्याचा आणि शांततेचा संदेश देण्याची प्रेरणा देतो.

कच्छी मस्जिद, अकोला यांच्या वतीने मी सर्व शहरवासीय आणि देशवासीयांना रमजानच्या हार्दिक शुभेच्छा देतो. या पवित्र महिन्यात आपण गरजूंना मदत करण्याचा, स्वच्छता व शिस्त पाळण्याचा आणि बंधुता वाढवण्याचा संकल्प करूया.

अल्लाह तआला आपल्या सर्वांच्या दुआ आणि इबादती कबूल करो, आपले पाप माफ करो आणि आपल्या शहर व देशात शांतता, ऐक्य आणि बंधुभाव कायम ठेवण्याची तौफीक देवो असेही जावेद जकरिया यांनी सांगितले.

## आत्मविश्वास, निसर्ग सेवेमुळे करता येते कॅन्सरवर मात - बाळ काळणे

प्रतिनिधी १७ फेब्रुवारी

**अकोला:** ८ ते १४ फेब्रुवारी पर्यंत कॅन्सर जनजागृती प्रबोधन यात्रा अहिल्या नगर ते कोकण विभागात झाली. आत्मविश्वास व निसर्ग सेवा, समाजसेवेने कॅन्सर व अपंगत्वावर मात करता येते. सेवा करताना कॅन्सरमुळे शारिरीक व मानसिक स्थितीतील परिणाम विसरण्यास मदत होते. कॅन्सर विसरणे हा आनंदी राहण्याचा मानसिक उपचार प्रभावी ठरतो असे सर्पमित्र तथा मानद वन्यजीव रक्षक बाळ काळणे म्हणाले.

कॅन्सर नंतर आपली धाडसी सेवा पुर्वी पेक्षाही वाढल्याचे सांगून सर्पसेवा, वन्यजीव सेवा,



आपत्कालीन सेवा याची कार्यरत उदाहरणे काळणे यांनी दिली. कॅन्सर नंतर समुद्राच्या मध्य भागात पोहणे व आसने करणे, स्कुबा डायव्हिंग केल्याचे सांगितले. बाळ काळणे कॅन्सर जनजागृती लोकांसाठी करत आहेत. आतापर्यंत मराठवाडा , विदर्भ, खानदेश, पश्चिम महाराष्ट्र यावर्षी कोकण ह्या विभागात कॅन्सर प्रबोधन यात्रा झाली. जिल्हा व तालुका पातळीवरील मेडिकल कॉलेज, जिल्हा परिषद, सेंट्रल जेल , पोलिस डिपार्टमेंट ,लायन्स क्लब, रोटरी क्लब त्या त्या जिल्ह्यातील डॉक्टर्स युनियन , आदिवासी भाग , खुले नागरिक मंच अशा ठिकाणी स्थानिक आयोजक सुचवतील त्या प्रमाणे कार्यक्रम होत असतात.

व्याख्याना द्वारे त्यांनी लाखो लोकांपर्यंत पोहोचवुन 'कॅन्सर जागृति ब्रॅण्ड ॲम्बेसेडर 'च्या भूमिकेत ते कार्य करत आहेत. कॅन्सर झाल्या नंतर कॅन्सरवर जनजागृति करून कॅन्सर प्रबोधन यात्रा व इतर ठिकाणी कॅन्सर व्याख्यान कार्यक्रम त्यांनी दोनशेवर करून कॅन्सर व्यक्तिना धीर देत लोकजागृत केले .तर अनेक कॅन्सर व्यक्तिंच्या प्रत्यक्ष भेटी घेवून त्यांना पेशंट मधुन ' कॅन्सर योद्धा 'बनवत आहेत. प्रयास संस्थेचे डॉ अविनाश सावजी व कॅन्सर पॅलेटीव्ह सेंटरचे अहिल्या नगरचे प्रमुख व कॅन्सर सेवक मा .प्रदिप काकडे ही जवाबदारी घेत असतात. अकोला जिल्ह्यातील शासकीय उपक्रम राबवणारी उमेद हया संस्थेच्या महिला पदाधिकारी सौ.दिपाली म्हैसने, सौ. चंदा लव्हाळे, सौ.अनुराधा जांभळे हया समाज सेविका यांनी कॅन्सर प्रबोधन यात्रेत सर्व तऱ्हेत महत्वपुर्ण सेवा केली .

## मूर्तिजापूर नगर परिषदेत अनागोंदीचा कळस

**अग्निशमन दलाच्या गाडीचे चाक चोरीला; लाखो रुपयांची साधने असूनही शहराची सुरक्षा धोक्यात..प्रतिक कुऱ्हेकर**

प्रतिक कुऱ्हेकर १७ फेब्रुवारी

**मूर्तिजापूर:** नगर परिषद प्रशासनाचा भोंगळ कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. नगर परिषदेच्या जुन्या अग्निशमन दलाच्या उभ्या असलेल्या गाडीचे चाक अज्ञात व्यक्तीने जॅक लावून काढून नेल्याची अत्यंत गंभीर बाब समोर आली आहे. विशेष म्हणजे, या घटनेबाबत नगर परिषदेच्या वतीने अद्याप कोणतीही पोलीस तक्रार दाखल करण्यात आलेली नसल्याने संशयाची सुई प्रशासनाकडे वळत आहे.

दरम्यान, नगर परिषदेच्या वतीने काही दिवसांपूर्वी तीन नवीन अग्निशमन दलाच्या गाड्या आणि दोन बुलेट वाहने खरेदी करण्यात




आली होती. या वाहनांचे उद्घाटन विद्यमान आमदार हरीश पिंपळे यांच्या हस्ते मोठ्या थाटामाटात करण्यात आले. मात्र उद्घाटनाला अवघा काही काळ लोटत नाही तोच, यातील बुलेट वाहन अग्निशमन विभागाच्या कामाऐवजी कर्मचाऱ्यांकडून इतर शासकीय व खासगी कामांसाठी वापरले जात असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे.

शासनाचे लाखो रुपये खर्च करून अग्निशमन दलासाठी आधुनिक वाहने व उपकरणे खरेदी करण्यात आली असली, तरी प्रत्यक्षात अग्निशामक विभागाकडे चालक व प्रशिक्षित फायरमनच उपलब्ध नसल्याची गंभीर स्थिती आहे. त्यामुळे आपत्कालीन प्रसंगी आग विझवण्यासाठी साधने असूनही ती वापरण्यास मनुष्यबळ नसल्याने मूर्तिजापूर शहराच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

याहून गंभीर बाब म्हणजे, अग्निशमन विभागाला देण्यात आलेल्या कार्यालयात आधार केंद्र सुरू करण्यात आल्याने अग्निशामक विभाग अक्षरशः बेघर झाल्याचे चित्र दिसत आहे. अग्निशमन दलासारख्या अत्यावश्यक सेवेच्या कार्यालयावरच गदा येणे ही प्रशासनाच्या संवेदनशीलतेवर मोठा प्रश्नचिन्ह उपस्थित करणारी बाब ठरत आहे.

## स्काऊट गाईड मेळाव्यात किड्स पॅराडाईजची बाजी

प्रतिनिधी १७ फेब्रुवारी

**पातूर :** भारत स्काऊट-गाईडच्या पार पडलेल्या ३६ व्या तीन दिवसीय जिल्हा मेळाव्यात पातूरच्या किड्स पॅराडाईज पब्लिक स्कूलने बाजी मारली आहे.

तेल्हारा तालुक्यातील मनब्दा येथे जिल्हास्तरीय स्काऊट गाईड मेळावा पार पडला. या मेळाव्यात जिल्ह्यातील विविध शाळांमधील सुमारे एक हजार स्काऊट व गाईड विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. त्यामध्ये किड्स पॅराडाईज मधील ३२ स्काऊट १९, गाईड असे एकूण ५१ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या मेळाव्यामध्ये शारीरिक प्रात्यक्षिके, गॅजेट स्पर्धा, शेकोटी कार्यक्रम स्पर्धा, शोभायात्रा, बिन भांड्याचा स्वयंपाक अश्या विविध




स्पर्धा पार पडल्या. यामधील शारीरिक प्रात्यक्षिके स्पर्धेत स्काऊट - प्रथम,गाईड - प्रथम, तर गॅजेट स्पर्धेमध्ये स्काऊट - द्वितीय, शेकोटी कार्यक्रम मध्ये स्काऊट - तृतीय, शोभायात्रेत विशेष झाकी म्हणून प्रोत्साहन पर, उत्कृष्ठ सादरीकरण व सहभाग - सन्मान चिन्ह देऊन किड्स पॅराडाईज पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले.

या मेळाव्यात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या स्काऊट - गाईड पथकांचा सत्कार आमदार अमोल मिटकरी यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी जिल्हा प्रशिक्षण आयुक्त (स्काऊट) श्रीकृष्ण डांबलकर, जिल्हा संघटक (स्काऊट) किरण लहाने, मेळावा प्रमुख (स्काऊट विभाग) राजेश पातळे, मेळावा प्रमुख (गाईड विभाग) सुषमा देशमुख, जिल्हा संघटक (गाईड विभाग) जयमाला जाधव, केंद्रप्रमुख विशाल घोगले, मुख्याध्यापक संघाचे जिल्हाध्यक्ष विलास खुमकर, मुख्याध्यापक अविनाश देशमुख, पी जे राठोड उपस्थित होते.

किड्स पॅराडाईजच्या या स्पर्धेत बाजी मारणाऱ्या विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणारे स्काऊटर अविनाश पाटील, क्रीडा शिक्षक अक्षय तायडे, गाईडर रेश्मा शेंडे, दिव्या गव्हाळे यांचा सन्मान शाळेचे संस्थापक अध्यक्ष गोपाल गाडगे व कार्यकारी संचालिका सौ. ज्योत्स्ना गाडगे यांनी केला.

## पालक सभा उत्साहात पार पडली




प्रतिनिधी १७ फेब्रुवारी

**अकोला:** यंग मुस्लिम एज्युकेशन अॅड सोशल वेलफेअर सोसायटी पातुरच्या सैयद मोहसीन उर्दु हायस्कुल अॅड ज्युनियर कॉलेज शिवणी येथे १६ फेब्रुवारी २०२६ रोजी संस्था सचिव सैयद अकबर अब्दुला सर यांच्या मार्गदर्शना खाली पालक सभेचे आयोजन करण्यात आले.

यावेळी सभेचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक सैयद मोहीब इकबाल सर होते प्रमुख पाहुणे म्हणून मोहम्मद इरशाद अब्दुल जावेद शेख एजाज सैयद रेहान अब्दुल नईम नाजीम अली उपसिथत होते प्रसताविक शाळेचे सहायक शिक्षक असीमोद्दीन यांनी केले व त्यानी कॉपीमुक्त अभियान व सभेचे उद्दिष्टे पालकां समोर मांडले व सैयद मोहीब इकबाल सर यानी आढळणा-या सामान्य व शैक्षणीक समस्या कडे पालकांचे लक्षवेधले व पुढील शिक्षणा करीता विधार्थाना शुभेच्छा दिले कार्यक्रमाचे शेवटी शाळेतील सहायक शिक्षक मो अनवारोद्दीन यानी सर्व पालकाचे आभार मानले कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी शाळेचे शिक्षक शमशेर खान मोहम्मद जाहीद शिक्षकेत्तर कर्मचारी खान अजमतउल्ला काजी मोइनोदीन मो फारूख अब्दुल शकुर सैयद वसीम यानी परिश्रम घेतले.

## आर.डी.जी. पब्लिक स्कूलमध्ये क्रीडा सप्ताह उत्साहाने साजरा

प्रतिनिधी १७ फेब्रुवारी

**अकोला:** आर.डी.जी. पब्लिक स्कूल मध्ये ०४ ते १४ फेब्रुवारी पर्यंत क्रीडा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. झाले. १४ रोजी सकाळी ९ वाजता वर्ग तिसरी पासून ते वर्ग आठवीच्या विद्यार्थ्यांकरिता विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. सर्वप्रथम एन.सी.सी. विद्यार्थ्यांच्या माध्यमातून शाळेचे संचालक दिलीपराज गोयनका यांचे स्वागत करण्यात आले. सर्वप्रथम उपस्थित मान्यवरांनी शाळेच्या संस्थापिका स्व. मधुमा यांना अभिवादन केले.

दिलीपराज गोयनका, प्राचार्य कुरीयचन सी.पी. , उपप्राचार्या श्वेता चोमवाल, भारतीय सेवा सदन सदस्या प्रा. इंदुबाला चौधरी मंचावर होत्या. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते स्कूल फ्लॅग होस्टिंग करण्यात आले. विद्यार्थीनी अनन्या देशमुखसह सर्वांनी क्रीडा प्रतिज्ञा घेतली. तसेच मशाल प्रज्वलित करण्यात आली व नंतर



ही मशाल क्रीडा क्षेत्रातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या हस्ते संपूर्ण मैदानात फिरविण्यात आली. यानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते आकाशात बलून सोडण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी सुंदर ड्रिल नृत्य , दुपट्टा ड्रिल नृत्य , क्रीडा नृत्य सादर करून सर्वांना मंत्रमुग्ध केले. . यावेळी शाळेचे संचालक श्री दिलीपराजजी गोयनका, प्राचार्य कुरीयचन सी.पी. यांनी आपले विचार व्यक्त करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तत्पश्चात वर्ग सातवी आणि नववीच्या विद्यार्थ्यांच्या विविध रेस घेण्यात आल्या ज्यामध्ये रनिंग रेस, पिरामिड रेस, हार्डल रेस आणि रिले रेस घेण्यात आल्या तसेच स्पर्धेतील विजेता विद्यार्थ्यांचे नाव घोषित करून उपस्थित मान्यवरांच्या हस्ते त्यांना प्रशस्तीपत्र व मेडल देऊन सन्मानित करण्यात आले. या दिवशी आयोजित क्रीडा कार्यक्रमाचे सुंदर संचालन शिक्षिका भूमिका ननवाणीसह वर्ग नववीच्या विद्यार्थिनी राशी कोठारी आणि समृद्धी खडके यांनी केले तर आभार स्वस्ति जैन हिने मानले. या क्रीडा सप्ताहास यशस्वी करण्याकरिता प्राचार्य कुरीयचन सी. पी., उपप्राचार्या श्वेता चोमवाल यांच्या मार्गदर्शनात क्रीडा शिक्षक पंकज कोकाटे, भूषण पाटील, बास्केटबॉल कोच कैलाश बोराडे, आरती बुंदेले, नृत्य शिक्षक शुभम बलिंगे, ऋषी गोपनारायण यांचे सहकार्य लाभले.

## मुक्ताई त्रिविध कार्याकरिता अवतरीत झाल्या होत्या - ज्ञानेश्वर महाराज वाघ

प्रतिनिधी १७ फेब्रुवारी

**अकोट:** अखिल विश्वधारार्थ जेव्हा ब्रह्मा ,विष्णू ,महेश हे त्रिदेव या अवनितलावर अवतरीत होण्याच्या पूर्वतयारीत असतांना जेव्हा योग माया आदिशक्तीच्या निदर्शनास आले. तेव्हा तिनेही त्यांच्यासोबत अवतरीत होण्याचा आग्रह धारण केला असता भगवान विष्णू म्हणाले की, आम्ही भगवंत म्हणून नाहीतर संत रूपाने अवतरीत होणार असून तू जर आमच्या सोबत आली तर हे योगमाये ! तू तुझ्या स्वभावाप्रमाणे आहे ते झाकून नाही ते दाखवीत आमच्या जगदोद्धाराच्या कार्याला आच्छादित करून टाकशील. तेव्हा ती म्हणाली तुम्ही तिघे मिळून तीन कार्य करणार परंतु मी मात्र एकटीच तुमच्या पाठची बहीण बनवून तुमची पाठ राखण करेल , मानसकन्याहून तुमच्या ठिकाणी जगदोद्धाराचे



वात्सल्य निर्माण करेल व प्रसंगी तुम्हा तीन मुक्तांची आई बनून तुम्हाला प्रेरणा देईल. दिलेल्या अभिवचना प्रमाणे हे तिन्ही कार्य मुक्ताई रूपाने अवतरीत झालेल्या योगमायेने केल्याचे भागवताचार्य ज्ञानेश्वर महाराज वाघ यांनी मांडले.

ते श्री ज्ञानेश आश्रम वारी भैरवगढ येथे श्रीसंत वासुदेवजी महाराजांच्या अवतिर्णोत्सवानिमित्य आयोजित ताटी उघडा ज्ञानेश्वरा ज्ञानयज्ञ सप्ताहातील प्रवचन प्रसंगी बोलत होते. ते पुढे म्हणाले की , ताटीच्या अकराही अभंगातून आई साहेबांच्या शब्दांचे स्वर जरी विनंतीचे असले तरी , त्यात आद्यत्रय जननी म्हणून अधिकार , लडिवाळ बहीण म्हणून आग्रह व मानसकन्या या नात्याने बाप आपली इच्छा पूर्ण करेलच अशा आत्मविश्वासाचे आहेत. असे त्रिविध भाव महाराजांनी त्यांच्याच चरित्रांतील बारकाव्यांच्या माध्यमातून श्रोत्यांच्या लक्षात आणून दिल्याचे भागवताचार्य ज्ञानेश्वर महाराज भालतिलक हे कळवितात.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
मंगळवार, दि. १७ फेब्रुवारी २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# कोयत्याने वार करून इसमाची निर्घृण हत्या; आरोपी जेरबंद

प्रतिनिधी १७ फेब्रुवारी

योगेश मडावी





**झरी जामणी :** तालुक्यातील शिबला येथे महाशिवरात्रीच्या दिवशी पूजा करत असलेल्या संतोष मानकू टेकाम (४६) यांची कोयत्याने निर्घृण हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. शेजाऱ्यांतील किरकोळ वादातून ही रक्तरंजित घटना घडल्याचा प्राथमिक अंदाज असून आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

दुपारी सुमारे तीनच्या सुमारास टेकाम हे घरासमोरील अंगणात तूराट्याच्या काड्यांचा मांडव उभारून भगवान शंकराच्या प्रतिमेसमोर पूजा करत होते. त्याचवेळी शेजारी राहणारा शालिक सिताराम आत्राम याने धारदार कोयत्याने अचानक हल्ला चढविला. हल्ल्यात टेकाम यांचा गळा कापण्यात आला तसेच दोन्ही हातांवर गंभीर वार करण्यात आले. डावा हात अंशतः तुटलेल्या अवस्थेत आढळून आला. घटनास्थळीच त्यांचा मृत्यू झाला.

आरडाओरड ऐकून धावलेल्या टेकाम यांच्या पत्नीने पतीला वाचविण्याचा प्रयत्न केला; मात्र झटापटीत त्या देखील जखमी झाल्या. त्यांना प्रथम उपजिल्हा रुग्णालय, पांढरकवडा येथे उपचारासाठी हलविण्यात आले. प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी जिल्हा रुग्णालय, यवतमाळ येथे रेफर करण्यात आले आहे.

घटनेनंतर आरोपी आत्राम हा कुटुंबासह पळून जाण्याच्या प्रयत्नात होता. मात्र, घटनेपासून सुमारे दहा किलोमीटर अंतरावर माथार्जुन बाजार परिसरात पोलिसांनी त्याला अटक केली. त्याच्याकडील धारदार कोयता जप्त करण्यात आला आहे.

माहिती मिळताच पाटण पोलीस स्टेशनचे ठाणेदार मिलिंद सरकटे व सहकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. वरिष्ठ अधिकाऱ्यांना माहिती देण्यात आली असून फॉरेन्सिक पथकाच्या उपस्थितीत तपास सुरू आहे.

■ मृत टेकाम यांना एक मुलगा व एक मुलगी अशी दोन अपत्ये असून दोघेही लहान वयोगटातील आहेत. या घटनेमुळे शिबला परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. आरोपीला ताब्यात घेण्यात आले असून घटनेमागील नेमके कारण शोधण्यासाठी पुढील तपास सुरू आहे.

# भोई समाज बांधवांवर उपासमारीची वेळ

**रिपब्लिकन युवा सेनेचा एल्गार; आठ दिवसांत न्याय न मिळाल्यास आंदोलनाचा इशारा**

प्रतिनिधी १७ फेब्रुवारी



**उमरखेड :** उमरखेड तालुक्यातील ग्रामीण भागातील भोई समाज बांधवांचा दैनंदिन उदरनिर्वाह पूर्णपणे करोडी रोड येथील मच्छी मार्केटवर अवलंबून आहे. या मार्केटमध्ये उपलब्ध जागा अपुरी पडल्याने मासे विक्री करणेही अशक्य झाले आहे. परिणामी, अनेक कुटुंबांवर उपासमारीची वेळ येऊन ठेपली असून, आर्थिक परिस्थिती पूर्णपणे विस्कटली आहे. भोई बांधव बेरोजगारी आणि कर्जबाजारीपणाच्या विळख्यात सापडले आहेत.

रिपब्लिकन युवा सेनेच्या नेतृत्वात गेल्या दीड वर्षांपासून मुख्याधिकारी, तहसीलदार, उपविभागीय अधिकारी आणि जिल्हाधिकारी यवतमाळ यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. उमरखेड तहसीलदारांनी यासंदर्भात आदेशही काढले, तरी त्याची अमलबजावणी होत नाही. नगरपरिषद उमरखेडने रिपब्लिकन युवा सेनेला दिलेले लेखी आश्वासनही पाळले गेले नाही.

याप्रकरणी रिपब्लिकन युवा सेनेने उमरखेड नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना विषयाचे गांभीर्य निदर्शनास आणले आहे. मच्छी मार्केटमध्ये तात्काळ जागा उपलब्ध करून देण्याची मागणी केली असून, येत्या आठ दिवसांत न्याय मिळाला नाही तर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.

यावेळी रिपब्लिकन युवा सेनेचे जिल्हाध्यक्ष सुनिल पाटील चिंचोलकर, शहराध्यक्ष शुद्धोधन दिवेकर, तालुका अध्यक्ष गौतम नवसागरे, तालुका उपाध्यक्ष राजू आगीरे यांच्यासह गजानन भोयर, भावराव भोयर, सकाराम राकडे, काशिनाथ आगिरे, देवराव राकडे, विजय राकडे, उमेश राकडे, नारायण राकडे, श्रीराम आगिरे, संजय कामरे, सुरेखाबाई कामरे, मुनेश्वर राकडे, रामदास राकडे, लक्ष्मण राकडे, माधव राकडे, देविदास राकडे, अंबादास राकडे, गणेश आगीरे, अंकुश आगीरे, मुकुंदा राकडे, रामदास आगिरे, गजानन राकडे, शामराव आगिरे तसेच तालुक्यातील भोई समाजाचे मोठ्या संख्येने बांधव उपस्थित होते.

भोई समाजाच्या या ज्वलंत समस्येकडे प्रशासनाने त्वरित लक्ष देऊन मार्केटमध्ये पुरेशी जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी या आंदोलनातून करण्यात आली आहे. अन्यथा, संघटनेकडून तीव्र लढा देण्यात येईल, असा इशारा देण्यात आला.

# दुचाकीची बैलगाडीला धडक; लग्नपत्रिका वाटण्यासाठी निघालेल्या युवक ठार

प्रतिनिधी १७ फेब्रुवारी

**यवतमाळ :** लग्नाच्या पत्रिका वाटण्यासाठी दुचाकीवरून निघालेल्या २३ वर्षीय युवकाचा बैलगाडीला धडक बसून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना उमरखेड तालुक्यातील खरुस-टेंभुरधरा मार्गावर घडली. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

माधव मारुती बंडेवार (वय २३, रा. बिटरगाव बुद्रुक, ता. उमरखेड, जि. यवतमाळ) हा १४ फेब्रुवारी रोजी सायंकाळी साडेसातच्या सुमारास लग्नपत्रिका वाटण्यासाठी दुचाकी (क्र. एमएच-२९ बीएक्स-७६३७)वरून खरुस ते टेंभुरधरा मार्गे जात होता.

दरम्यान, आरोपी साहेबराव नामदेव गल्लेवाड (वय ५५, रा. खरुस, ता. उमरखेड) हा आपल्या ताब्यातील बैलगाडी अंधारात कोणतीही खबरदारी न घेता रस्त्याच्या मधोमध चालवत असल्याचा आरोप आहे. त्यामुळे दुचाकी व बैलगाडीची जोरदार धडक झाली. या अपघातात माधव बंडेवार गंभीर जखमी झाला. उपचारासाठी हलविण्यात आले असता त्याचा मृत्यू झाला. या घटनेप्रकरणी रमेश मारुती बंडेवार (२२) यांच्या फिर्यादीवरून गुन्हा क्र. ४७/२०२६ कलम १०६(१) अंतर्गत नोंद करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# हाजण दुंगे यांचे निधन

प्रतिनिधी १७ फेब्रुवारी



**आर्णी :** येथील निलावार ले-आऊट परिसरातील रहिवासी हाजण आमीनाबी गन्नी दुंगे (७३) यांचे शनिवारी सकाळी राहत्या घरी वृद्धापकाळाने निधन झाले. त्या येथील एकता चिकन सेंटरचे संचालक हाजी ईरफान दुंगे यांच्या मातोश्री होत. त्यांच्या पश्चात मोठे सुपुत्र हाजी युनुस दुंगे, हाजी ईरफान दुंगे, हाजी आरीफ दुंगे, दोन मुली तसेच मोठा आप्तपरिवार असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने दुंगे कुटुंबावर शोककळा पसरली आहे. त्यांच्या पार्थिवावर शनिवारी सायंकाळी पाच वाजता मुस्लिम रीतीरिवाजानुसार येथील जुन्या कब्रस्तानमध्ये दफनविधी करण्यात आला.

# ४० वर्षांच्या अतिक्रमणातून मुक्त झाले वणीतील नाग मंदिर

प्रतिनिधी १७ फेब्रुवारी



**वणी :** शहरातील प्रभाग क्रमांक १० मधील टुटी कमान चौक येथे असलेले नाग मंदिर तब्बल ४० वर्षांपासून अतिक्रमणामुळे झाकले गेले होते. मंदिर परिसर अतिक्रमणाच्या विळख्यात सापडल्याने भाविकांना दर्शनासाठी अडचणींचा सामना करावा लागत होता.

मात्र आता मंदिराने अक्षरशः मोकळा श्वास घेतला आहे. न्यूज मिडिया पत्रकार असोसिएशन चे अध्यक्ष दिपक छाजेड व सचिव परशुराम पोटे यांच्या पुढाकाराने मंदिर परिसरातील अतिक्रमण हटवून स्वच्छता व सुशोभीकरणाचे काम हाती घेण्यात आले. त्यामुळे परिसर खुला, स्वच्छ आणि आकर्षक बनला असून भाविकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. या कार्यासाठी न्यूज मिडिया पत्रकार असोसिएशन, दिपक मत्ते तसेच जयशजी चोरडिया यांनी आर्थिक सहकार्य केले. त्यांच्या सहकार्यामुळे हे काम अल्पावधीत पूर्ण होऊ शकले. महाशिवरात्रीच्या निमित्ताने सायंकाळी ५ वाजता प्रभाग क्र. १० चे नवनिर्वाचित नगरसेवक व आरोग्य सभापती अनिल चिंडालिया, जयश चोरडिया तसेच दिपक छाजेड, राजु धावंजेवार,राजु जयस्वाल यांच्या हस्ते विधिवत पूजा करण्यांत आली. या कार्यक्रमास नागरिक व भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी न्यूज मिडिया पत्रकार असोसिएशनचे सचिव परशुराम पोटे, ज्ञानेश्वर बोनगीनवार, महादेव दोडके, विशाल ठोंबरे, संजय चिंचोलकर यांच्यासह न्यूज मिडिया पत्रकार असोसिएशनच्या सदस्यांचे सहकार्य लाभले.

# वृद्धाचा कुजलेल्या अवस्थेत मृतदेह आढळला

प्रतिनिधी १७ फेब्रुवारी

**घाटंजी :** पारवा पोलीस स्टेशन हद्दीतील मांजरी येथील शेतशिवारालगतच्या जंगल परिसरात एका वृद्धाचा कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. ही घटना दि. १५ रोजी उघडकीस आली.

मांजरी येथील पोलीस पाटील यांनी जंगल परिसरात एक इसम मृत अवस्थेत पडून असल्याची माहिती पारवा पोलिसांना दूरध्वनीवरून दिली. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. दरम्यान, मृत व्यक्तीची ओळख त्यांचा मुलगा महादेव श्रीराम उईके यांनी अंगावरील कपड्यांवरून श्रीराम खेत्रूजी उईके रा. बोदडी अशी पटवली. प्राथमिक माहितीनुसार, श्रीराम उईके हे जंगलातून वाळलेल्या काड्या गोळा करून त्यांची विक्री करत उदरनिर्वाह करीत असल्याचे समोर आले आहे. मृतदेह कुजलेल्या अवस्थेत आढळल्याने मृत्यू नेमका कधी व कोणत्या कारणामुळे झाला, याबाबत अद्याप स्पष्टता आलेली नाही. या प्रकरणी पारवा पोलीस स्टेशन येथे नोंद करण्यात आली असून पुढील तपास ठाणेदार हेमंत चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. मृत्यूचे नेमके कारण शवविच्छेदन अहवालानंतर स्पष्ट होणार आहे.

# पारवा येथील १२ जण घरकुलपासून वंचित

प्रतिनिधी १७ फेब्रुवारी

नारायण गटलेवार



**पारवा :** पारवा येथील १२ घरकुल लाभार्थ्यांना मागील दोन वर्षांपासून केवळ जॉब कार्ड दुरुस्तीच्या प्रशासकीय प्रक्रियेमुळे घरकुल योजनेचा लाभ मिळालेला नाही. घरकुलाच्या अधिकृत यादीत नाव असूनही प्रत्यक्ष मंजुरी मिळत नसल्याने लाभार्थी संभ्रमात आहेत.

संबंधित लाभार्थ्यांकडे असलेल्या जुन्या जॉब कार्डवर घरकुल योजनेचा कोणताही लाभ नोंदलेला नव्हता. त्यामुळे गटविकास अधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार सर्व १२ जणांनी नवीन जॉब कार्ड तयार केले. रोजगार हमी योजनेअंतर्गत मजुरीची रक्कम नवीन कार्डवर जमा होत असली, तरी घरकुल मंजुरीची प्रक्रिया अद्याप प्रलंबित आहे.

या संदर्भात पारवा ग्रामपंचायत कार्यालयामार्फत अनेक वेळा पाठपुरावा करण्यात आल्याचे सांगण्यात येते. दोन ग्रामसभांमध्ये हा मुद्दा मांडण्यात आला होता. तसेच पंचायत समिती घाटंजी येथील विस्तार अधिकाऱ्यांनाही लेखी माहिती देण्यात आली होती. वरिष्ठांशी चर्चा करून मार्गदर्शन देण्याचे आश्वासन देण्यात आले; मात्र ठोस निर्णय अद्याप झालेला नाही.

दरम्यान, ग्रामपंचायत स्तरावर प्रस्ताव पाठविण्यात आल्याचे सांगितले जात असले तरी प्रत्यक्षात लाभार्थ्यांना घरकुल मंजुरी मिळालेली नाही. परिणामी, पात्र असूनही हे १२ जण घरकुलापासून वंचित राहण्याची भीती व्यक्त करत आहेत. संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने दखल घेऊन घरकुल द्यावे, अशी मागणी होत आहे.

# श्री संत सेवालाल महाराज जयंती उत्साहात

प्रतिनिधी १७ फेब्रुवारी



**आर्णी :** शहरातील बंजारा समाज बांधवांनी आज श्री संत सेवालाल महाराज यांची जयंती मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहाने साजरी केली. महाराजांच्या जयंतीनिमित्त ठिकठिकाणी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच भव्य दिव्य रॅली काढण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात संत महाराजांच्या प्रतिमेला माल्यार्पण, पूजा-अर्चना करून झाली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आर्णी कुर्षी उपन्न बाजार समितीचे अध्यक्ष अनिल रामजी आडे, शिवसेना (शिंदे गट) चे राजुदास जाधव, बंजारा तांडा नायक रमेश नाईक, डॉ. विलास चव्हाण, टी.डी. चव्हाण, अनिल राठोड, सह. बोरगाव येथील मानुदास जीनींग व प्रेसिंगचे संचालक रणजीत (राणा) राठोड, अश्वजीत राठोड, आमोल मुरली पवार, अंजली ड्रेसेसचे संचालक संतोष श्रीवास आदी उपस्थित होते.

समस्त बंजारा समाजाचे बंधू-भगिनी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. रॅलीतून शहरातील प्रमुख रस्त्यांवरून जाण्यात आले. महाप्रसाद वाटपानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

# महाशिवरात्रीनिमित्त भक्तांची दर्शनासाठी अलोट गर्दी

**श्री सिद्धेश्वर महादेव मंदिरात भक्तिमय वातावरण**

प्रतिनिधी १७ फेब्रुवारी




**आर्णी :** महाशिवरात्रीच्या पावन पर्वानिमित्त आर्णी येथील प्राचीन श्री सिद्धेश्वर महादेव मंदिर येथे भाविकांची अलोट गर्दी उसळली. पहाटेपासूनच मंदिर परिसर 'हर हर महादेव'च्या जयघोषाने दुमदुमून गेला होता. संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाल्याने वातावरण अत्यंत मंगलमय व उत्साहपूर्ण झाले होते. महाशिवरात्रीनिमित्त मंदिरात विशेष अभिषेक, रुद्रपाठ, भजन-कीर्तन आणि महाआरतीचे आयोजन करण्यात आले होते. भाविकांनी बेलपत्र, फुले आणि दुग्धाभिषेक अर्पण करून भगवान शंकराचे दर्शन घेतले. अनेक भक्तांनी उपवास करून रात्रभर जागरण करत शिवनामस्मरण केले. मंदिरचे परिसर आकर्षक विद्युत रोषणाई व फुलांच्या सजावटीने उजळून निघाला होता. स्थानिक ग्रामस्थ व मंदिर समितीच्या वतीने भाविकांसाठी पिण्याच्या पाण्याची, प्रसादाची तसेच रांग व्यवस्थेची उत्तम सोय करण्यात आली होती. पोलिस प्रशासन व स्वयंसेवकांनीही गर्दी सुरळीत पार पडावी यासाठी विशेष दक्षता घेतली. महाशिवरात्रीच्या निमित्ताने आर्णी शहरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून सर्वत्र धार्मिक उत्साहाचे चित्र पाहायला मिळत आहे. श्रद्धा, भक्ती आणि शिस्तबद्ध आयोजन यामुळे यंदाची महाशिवरात्री आर्णीकरांसाठी संस्मरणीय ठरली आहे.

# कवी-लेखकच समाजाला देतील दिशा

**राम देवसरकर : गुंजन पाटीलच्या 'लक्ष्मणरेखा'ने विद्यार्थ्यांना दिला संदेश!**

प्रतिनिधी १७ फेब्रुवारी



**उमरखेड :** आजच्या डिजिटल युगात सोशल मीडिया, राजकारण, टीव्ही सगळं काही चाललंय, पण खरी समाजाला दिशा देणारं काम फक्त कवी आणि लेखकच करू शकतात! असा धाडसी आणि थेट फटका मारला यवतमाळ जिल्हा अखिल कुणबी समाजाचे अध्यक्ष आणि संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ सिनेट सदस्य राम देवसरकर यांनी. गोपिकाबाई सीताराम गावंडे महाविद्यालयात झालेल्या 'कलाविष्कार' स्नेहसंमेलनच्या उद्घाटनप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. हे वाक्य ऐकून तर विद्यार्थी-विद्यार्थिनींनी टाळ्यांचा गजर केला!

रामभाऊंनी तरुणाईला थेट सांगितलं, "संधी हातातून जाऊ देऊ नका! करिअर करा, स्वतःच्या पायावर उभे राहा. कुणावर अवलंबून राहिलात तर कधीच उभे राहणार नाही!" हे ऐकून तरुणांच्या डोळ्यात चमक दिसली.

**गुंजन पाटील यांनी व्यासपीठावर लावली आग!** छत्रपती संभाजीनगरच्या सुपरहिट कवयित्री गुंजन पाटील यांनी कवितांची बरसात केली. 'भ्रष्टाचार', 'मुलींना सारं कळतं!' आणि सोशल मीडियावर व्हायरल झालेली 'लक्ष्मणरेखा' ही कविता सादर केली. "लक्ष्मणरेखा आता अन्याय करणाऱ्यांसाठी आखायची आहे, बायकांसाठी नाही!" असा जोरदार संदेश देत त्यांनी स्त्री भ्रूणहत्या, स्त्री सशक्तीकरण अशा विषयांवर भावुक कविता ऐकवल्या.

मुलींना थेट बोलताना त्या म्हणाल्या, "मुलींनो, स्वतःचं स्वतंत्र घर बनवा... असं घर की, कोणी 'ऊठ, जा' म्हणू शकणार नाही! सोशल मीडियाचा जबाबदारीने वापर करा, माणुसकी जपून ठेवा. महाविद्यालयं माणुसकी शिकवतायत, बाहेरचं जग कमी करतंय!" कार्यक्रमात IQAC न्यूजलेटर आणि अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. उषा पाटील यांच्या चार पुस्तकांचं प्रकाशन झालं. प्राचार्य डॉ. माधवराव कदम यांनी महाविद्यालयाच्या प्रगतीचा रिपोर्ट कार्ड सादर केला. अध्यक्ष डॉ. यादवराव राऊत यांनी स्नेहसंमेलनाला शुभेच्छा दिल्या. समारोपात ॲड. विलासराव देवसरकर आणि अमोल इंगळे यांनी विद्यार्थ्यांना प्रबोधन केलं. विद्यार्थिनी वंशिका गंगात्रे, कल्याणी वानखेडे, वैभवी संगेवार, मंगेश कदम, साईनाथ निर्मलवाड, राहूल कांबळे, रितेश गाडेकर यांनी सूत्रसंचालन आणि आभार मानले. प्राचार्य डॉ. कदम यांच्या मार्गदर्शनाखाली सांस्कृतिक विभाग, प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# तेली प्रीमियर लीगमध्ये रिंगस क्रिकेट क्लबचा विजय

प्रतिनिधी १७ फेब्रुवारी



**पुसद :** मुस्लिम तेली समाजाच्या वतीने काकडदाती येथील डीजे टर्फवर आयोजित तेली प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेत रिंगस क्रिकेट क्लबने बाजी मारली. तीन दिवस चाललेल्या या उत्साही स्पर्धेत ८ संघांनी भाग घेतला होता. अंतिम सामन्यात रिंगस क्रिकेट क्लबने निरबाण क्रिकेट क्लबवर मात करत प्रथम क्रमांक पटकावला.

विजेत्या रिंगस क्रिकेट क्लबला ७७७७ रुपयांचे रोख बक्षीस हनिफ निरबाण यांच्या वतीने देण्यात आले. तर दुसऱ्या क्रमांकाच्या निरबाण क्रिकेट क्लबला ५५५५ रुपयांचे बक्षीस फिरोज तगाले यांच्या वतीने मिळाले. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनात अनेक मान्यवरांनी सहभाग घेतला.

**विजेत्या संघाचे खेळाडू गाजले**

अंतिम सामन्यात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अनिस निरबाण यांना मॅन ऑफ द मैच आणि बेस्ट प्लेयर ऑफ द मैचचा पुरस्कार मिळाला. शाहरुख निरबाण यांना बेस्ट फिल्डर, तर मोहसिन निरबाण यांना बेस्ट बॉलरचा सन्मान देण्यात आला. मॅन ऑफ द सिरीजचे चारही पुरस्कार मुबारक निरबाण यांच्या वतीने प्रदान करण्यात आले.

**ट्रॉफी वाटप सोहळा**

विजेत्या संघाची ट्रॉफी हाजी अजीस चव्हाण यांच्या हस्ते, तर दुसऱ्या क्रमांकाची ट्रॉफी निजाम जी गौरी यांच्या हस्ते देण्यात आली. प्रत्येक सामन्यातील मॅन ऑफ द मैच ट्रॉफी रहेमान असलम चव्हाण यांच्या तर्फे देण्यात आल्या. या प्रसंगी हनिफ निरबाण, फिरोज तगाले, हाजी हनिफ चव्हाण, मुबारक निरबाण, हाजी अजीस चव्हाण, युनूस निरबाण, अनिस चव्हाण, मतीन चव्हाण, जुबेर चव्हाण, सलीम निरबाण, वसीम निरबाण, सरफराज निरबाण आदी मान्यवर उपस्थित होते.

**रेफरी आणि आयोजकांचे योगदान :** स्पर्धेत रेफरी म्हणून ताज जिंदरान आणि फहिम मेमन यांनी निष्पक्ष भूमिका बजावली. सूत्रसंचालन लतीफ गौरी यांनी केले. आयोजन समितीमध्ये अजहर निरबाण, जम्मा गौरी, विक्की गौरी, शकील गौरी, अब्दुल रहेमान चव्हाण, फारूक चव्हाण, लतीफ गौरी, रशीद मामा चव्हाण, सोहेल निरबाण, युसुफ निरबाण, रहेमान गौरी, इद्रिस रजा, वसीम चव्हाण, सोनू तगाले, अनस चव्हाण, सलमान निरबाण, लकी निरबाण यांच्यासह अनेक क्रिकेटप्रेमींनी अथक परिश्रम घेतले.

५
सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
मंगळवार दि. १७ फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com






## वाशीम रेल्वे स्टेशनवरील पार्कींगवाल्यांची...

# दादागिरीची हद्द, ठेका करा रद्द !

## रेल्वे समितीचे सदस्य जुगलकिशोर कोठारी व सुरज चौधरी यांनी केली खुद्द

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

वाशीम रेल्वे स्टेशनवर काहीच कारण नसतांना सिसीटीव्ही कॅमेरे असतांना पार्कींगचे पैसे देवूनही पार्किंगमध्ये ठेकेदाराची दादागिरी दररोज वाढत आहे. या ठेकेदारासोबत रेल्वे अधिकाऱ्यांची भागिदारी असल्यामुळे आपले कोणची काही करू शकत नसल्याने तो मग्रूर ठेकेदार प्रवाशाना अश्लिल भाषेत महिलांसमोरच शिवीगाळ करून मारहाणीची भाषा करतो, या सर्व प्रकाराला वाशीम शहरातील नागरिक त्रस्त झाले आहेत. त्याच्या आरेरावीचा व दादागिरीचा पोलिसांना शिवीगाळ केल्याचा व्हिडीओ सोशल मिडीयावर व्हायरल झाला होता. या सर्व प्रकाराची सर्वप्रथम सिटी न्युज सुपरफास्टने व आरआरसी सिटी न्युज चॅनलने वृत्त लावून धरून पाठपुरावा केला. त्यामुळे पोलिसांनीच या मग्रूर ठेकेदाराविरूध्द गुन्हा दाखल केला असून हा ठेकेदार फरार आहे. तर या दादागिरी करणाऱ्या ठेकेदाराचा ठेका रद्द करा अशी मागणीच रेल्वे समितीचे सदस्य जुगलकिशोर कोठारी व सुरज चौधरी यांनी रेल्वे अधिकाऱ्यांकडे केली आहे.

माणुसकी नावाचा काही प्रकार असतो. चांगल्या बोलण्याने वागल्याने माणुस पैशाकडेही पाहत नाही रेल्वे स्टेशनच्या परिसरात गाडी आल्यापासुन मोठ्या आवाजात दादागिरीने बोलुन लोखंडी रॉड घेऊन मारण्याच्याच हेतुने ठेकेदार उभा असतो प्रेमाने काहीच बोलत नाही. घाण घाण शिवीगाळ करत गाडी पार्कींग करा. नाहीतर मारहाण करण्याच्या थेट धमक्या देतो. प्रवाशा सोबत बहुतांशी महिला व मुलीअसतात त्यांनाही न जुमानता मागील पुढील विचार न करता थेट अश्लिल शिवीगाळ करुन मारण्याच्या धमक्या देतो.अनेकांना रॉडने मारहानी केल्याच्या सुध्दा तक्रारी आहेत.प्रेमाने प्रवाशी भिकाऱ्याला व तृतीय पंथ्याला १० रुपयाऐवजी २० रुपये देतात. मात्र हा मगरुर ठेकेदार ६ रुपयाच्या पार्कींगसाठी प्रवाशांवर दादागिरी करतो. त्याला रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्याची साथ असल्याची चर्चा आहे. वाशीम रेल्वे स्टेशन येथील पार्किंगमध्ये अनेक धक्कादायक प्रकार उघडकीस येत आहेत. पार्कींग मधील बाईक घेण्यासाठी आलेल्या युवकासह थेट पोलिसांना पार्किंग ठेकेदाराने अश्लील भाषेत शिवीगाळ केल्याचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर जोरदार व्हायरल होत आहे. या घटनेमुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात असून या पार्कींग ठेकेदारावर गुन्हा दाखल झाला असून आता ठेका रद्द करावा अशी मागणी सर्व सत्तरातुन होत आहे.



वाशीम रेल्वे स्टेशन येथील पार्किंगमध्ये एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला होत.पार्कींगची पावती नसल्याने बाईक घेण्यासाठी आलेल्या युवकासह थेट पोलिसांना पार्किंग ठेकेदाराने अश्लील भाषेत शिवीगाळ केल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर जोरदार व्हायरल झालं होतं.त्यानंतर या घटनेमुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात होतं.तसेच या मुजोर पार्कींग ठेकेदारावर कठोर कारवाईची मागणी सर्व स्तरातून केली जात होती.आता या व्हायरल व्हिडीओची पोलिसांकडून गंभीर दखल घेण्यात आली असून शिविगाळ करणाऱ्या ठेकेदारावर अखेर वाशीम शहर पोलिसात विविध कलमा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आहे.पोलीस या ठेकेदाराचा शोध घेत असून तो फरार झाल्याची माहिती आहे.

### ठेकेदाराला काळ्या यादीत टाका - जुगलकिशोर कोठारी



दादागिरी करून कारण नसतांना प्रवाशांना विनाकारण त्रास देत असल्याच्या अनेक तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यामुळे अशा दादागिरी करणाऱ्या ठेकेदाराला काळ्या यादीत टाकून कठोर कारवाई करण्याची मागणी डीआरयूसीसीचे सदस्य, अखील भारतीय ग्राहक पंचायतचे अध्यक्ष, व्यापारी संघाचे माजी अध्यक्ष जुगलकिशोर कोठारी यांनी केली आहे. या पुर्वीही या मग्रूर ठेकेदाराच्या विरोधात ग्राहक पंचायतच्या वतीने, व्यापारी संघाच्या वतीने अनेक तक्रारी केल्या आहेत. नागरिकांनीही त्याच्या विरोधात तक्रारी करून गुन्हे दाखल केले आहेत.

### वाशिम रेल्वे स्थानकावरील पार्किंग ठेका रद्द करा -सूरज चौधरी



वाशिम रेल्वे स्थानकावरील पार्किंग ठेकेदाराकडून प्रवाशांशी गैरवर्तन, शिवीगाळ व अधिक दराने शुल्क आकारले जात असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. या प्रकारामुळे प्रवाशांना त्रास होत असून रेल्वे प्रशासनाची बदनामी होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर मध्य रेल्वेच्या झेडआरयूसीसीचे सदस्य सुरज तुळशीराम चौधरी यांनी नांदेड विभागाच्या वाणिज्य व्यवस्थापकांकडे लेखी निवेदन देत संबंधित पार्किंग ठेक्याची तात्काळ चौकशी करून ठेका रद्द करण्याची मागणी केली आहे.

### सिटी न्युज सुपरफास्टचा सततचा पाठपुरावा...

#### हजारो नागरिकांची धन्यवादाचे फोन

७ ते ८ वर्षापासून कारण नसतांना पार्कींगचे पैसे देवूनही विनाकारण महिलांसमोर अश्लिल शिवीगाळ करून दादागिरी करणाऱ्या मग्रुर ठेकेदाराला वाशीमचे नागरिक त्रस्त झाले होते. या संबंधिचे सर्वप्रथम सिटी न्युज सुपरफास्टने व आरआरसी न्युजने वृत्त प्रकाशित करून जनतेच्या भावनेला वाचा फोडली. त्यामुळे तीन दिवसापासून दररोज हजारो फोन सिटी न्युज सुपरफास्टला येत असून धन्यवाद देत आहेत. त्यामुळे जनतेच्या न्यायासाठी जनतेसोबत सिटी न्युज सुपरफास्ट कायम सोबत आहे आणि सोबत राहणार आहे.

---

## थोडक्यात

### पिंप्री अवगण येथे संत सेवालाल महाराज जयंती साजरी

●सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर●

येथील परमहंस झोलेबाबा विद्यालय व स्व.मधुकरराव ल.सपकाळ कला व विज्ञान महाविद्यालयामध्ये संत श्रीसेवालाल महाराज जयंतीनिमित्त १५ फेब्रुवारी रोजी भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.



कार्यक्रमाला संस्थेचे सचिव तथा महाविद्यालयाचे प्राचार्य सुनिल सपकाळ सर अध्यक्षस्थानी उपस्थित होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी संत सेवालाल महाराजांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत त्यांच्या आदर्शांचा समाजाने स्वीकार करावा, असे प्रेरणादायी विचार व्यक्त केले.

या प्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून प्रितम गौपाल सर यांनी संतांच्या कार्याचा आणि समाजप्रबोधन कार्यातील योगदानाचा सविस्तर आढावा घेतला.प्रमुख मार्गदर्शनपर भाषणात आनंद गोगे सर यांनी विद्यार्थ्यांना सेवालाल महाराजांच्या संदेशाचे पालन करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राघोजी अवगण सर यांनी प्रभावीपणे केले, तर प्रास्ताविक तुषार शिंगणे सर यांनी केले.आनंद कुलकर्णी सर यांनी मान्यवरांचे व उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.कार्यक्रमाला विशेष उपस्थिती म्हणून माजी सरपंच सर्जूभाऊ राठोड उपस्थित होते.तसेच ज्येष्ठ शिक्षक राठोड सर, गोरवे सर, भुसारी सर, दीक्षित सर, संतोष वानखडे सर, चेतन वानखडे सर, लांभाडे सर आणि सतीश यांचीही उपस्थिती लाभली.

# कॉपीमुक्त अभियान नव्हे, कॉपीयुक्त अभियान !

## *संस्थानिक, मुख्याध्यापक , केंद्रसंचालक, पर्यवेक्षक बैठेपथक आणि पोलिसांच्या संगनमताने परीक्षा केंद्रावर गैरप्रकार

## *वाशीम जिल्ह्यात बारावीच्या परीक्षा केंद्रावर कॉपीमुक्त अभियानाचा फज्जा

●सिटी न्युज ब्युरो @ रिसोड●

वाशीम जिल्ह्यातील बारावीच्या परीक्षा केंद्रावर सिसीटीव्ही कॅमेरे लावून परीक्षा पारदर्शक आणि कॉपीमुक्त असल्याचा दिखावा केल्या जात आहे.कोचिंग क्लासमध्ये शिकणाऱ्या नवश्रीमंतांची मुले, मुली कथित परीक्षा केंद्र असलेल्या आणि पास होण्याची हमखास गॅरंटी देणाऱ्या कनिष्ठ महाविद्यालयात हजारो रूपये देवून प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना विशेष सुविधा उपलब्ध करुन दिल्या जात असल्याची चर्चा आहे.या अभद्र प्रकारामुळे शासनाच्या कॉपीमुक्त अभियानाचा शिक्षण क्षेत्रातील भ्रष्ट मंडळीने फज्जा उडविल्याची जाणकारांमध्ये चर्चा आहे.

शासनाने मागीलवर्षापासून इयत्ता दहावी व बारावीच्या परीक्षा पारदर्शक आणि कॉपी मुक्त घेण्याचा धाडसी निर्णय घेतला आहे.या निर्णयामुळे आधुनिक संस्थानिक व शिक्षणाचे बाजारीकरण करणाऱ्या भ्रष्ट मंडळीने त्यांच्या मालकीच्या शाळा असलेल्या परीक्षा केंद्रामध्ये परीक्षा काळात विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असलेल्या सुविधा उपलब्ध असल्याची खोटी माहिती दिल्याचीही धक्कादायक माहिती उजेडात आली आहे. जिल्ह्यातील सर्वच परीक्षा केंद्रावर





बारावीची परीक्षा सुरू असलेल्या खोल्यांमध्ये सिसीटीव्ही कॅमेरे बसविल्याचे समजते.परंतु ज्या विद्यार्थ्यांकडून प्रवेशाचे व परीक्षेत हमखास पास करून देण्यासाठी हजारो रूपये घेणाऱ्या भ्रष्ट मंडळीने आता 'त्या' विद्यार्थ्यांना वर्ग खोल्यांमध्ये जावून तोंडाने उत्तरे सांगण्याचा अफलातून प्रकार सुरू केल्याचीही चर्चा आहे.तसेच खास विद्यार्थ्यांना परीक्षा झाल्यानंतर सिसीटीव्ही नसलेल्या दुसऱ्या खोलीमध्ये बसवून पुन्हा उत्तरपत्रिका देवून गाईड व नोटसमध्ये पाहून पेपर लिहिण्याची सुविधा सुद्धा उपलब्ध करून दिल्याचीही चर्चा आहे. जिल्ह्यातील कॉपीसाठी आणि हमखास पास होण्याची हजारो रूपये घेवून गॅरंटी घेणाऱ्या अनेक बारावीच्या परीक्षा केंद्राच्या आवारात काही कर्मचाऱ्यांचे निवासस्थाने आहेत.तसेच शाळेशी संबंधित असलेले आजी, माजी कर्मचारी, कथित संस्थानिक, शाळेतील सह्याजीराव शिक्षक प्रतिनिधी, बैठेपथकातील मंडळी आणि ड्युटीवर असलेले पोलीस कर्मचारी, होमगार्ड यांच्या संगनमताने जिल्ह्यातील अनेक कथित परीक्षा केंद्रावर कॉपीचा अभिनव प्रकार सुरू असल्याची चर्चा आहे.

भरारी पथकामध्येही शिक्षण विभागातील भ्रष्ट मंडळीचा सहभाग असल्याने कथित परीक्षा केंद्राला त्या भरारी पथकाने भेट दिल्याबरोबर नोटांची बंडले त्यांना दिल्या जात असल्याचीही शिक्षण विभागातच खमंग चर्चा आहे.शिक्षण विभागातील एका प्रामाणिक अधिकाऱ्याला 'भरारी' पथकात घेवू नये यासाठी मुख्याध्यापक संघटनेनी वरिष्ठांकडे साकडे घातल्याचीही जिल्ह्यात चर्चा आहे. कॉपीमुक्त अभियानाचा फज्जा उडविणाऱ्या भ्रष्ट मंडळीला शह देण्यासाठी आता जिल्हाधिकाऱ्यांनीच पुढाकार घेवून दोषी असलेल्या सर्व भ्रष्ट मंडळीवर फौजदारी कारवाई करावी अशी शिक्षणप्रेमी जनतेची मागणी आहे.

### कृषी सहायकांचे अप - डाउन ठरले शेतकऱ्यांसाठी डोकेदुखी !

●सिटी न्युज ब्युरो @ रिसोड●

तालुक्यातील शासकीय अधिकारी व कर्मचारी मुख्यालयी न राहता जिल्हास्तरावरून येणे जाणे करतात त्यामुळे नागरिकांची कामे खोळबंत आहे. पण याचं काहीच सोयरसुतक संबंधितांना नाही. तालुक्यातील बहुतांश कृषी सहाय्यक मुख्यालयी न राहता तालुक्याच्या तर काही कृषी सहाय्यक जिल्ह्याच्या ठिकाणी राहून कारभार पाहतात. त्यामुळे कृषी सहाय्यकाचे अप डाउन शेतकऱ्यांसाठी डोकेदुखी ठरली आहे.

### मंगरुळपीर येथे संभाजी ब्रिगेडची आढावा बैठक

●सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर●

स्थानिक विश्रामगृहात दि. १४ फेब्रुवारी रोजी संभाजी ब्रिगेडची आढावा बैठक पार पडली. यामध्ये सामाजिक कार्यात अग्रेसर राहून आगामी मिनी मंत्रालय असलेल्या जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूका तयारीनिशी लढविण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्यानिमित्ताने अनेकांनी संभाजी ब्रिगेडमध्ये प्रवेशही केला आहे.



बैठकीच्या अध्यक्षस्थानी संभाजी ब्रिगेडचे विभागीय अध्यक्ष गजानन भोयर तर जिल्हाध्यक्ष गजानन खंदारे, माजी जिल्हाध्यक्ष गणेश सुर्वे, जिल्हा उपाध्यक्ष श्रीकृष्ण शिंदे, जिल्हा सचिव रमेश मुंजे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा सचिव रमेश मुंजे, सूत्रसंचालन तालुकाध्यक्ष ॲड.अजय गवारगुरु तर आभार दिव्यांग आघाडीचे जिल्हाध्यक्ष बंडू भगत यांनी मानले. यावेळी संभाजी ब्रिगेडचे शहराध्यक्ष काझी नझीरुद्दीन, तालुका सचिव देवेंद्र खिराडे, संपर्क प्रमुख वसंता मोरे, रोशन आमटे, आदित्य दळवी, ॲड.मनिष पाटील, गजानन व्यवहारे, गोपाल पिंपळकर, मोहम्मद साहेब, अब्दुल मुजीब, किशोर गावंडे, विनोद पाचरने, सलमान शाह, हकीम शाह आदी उपस्थित होते.

# खासगी वाहतूकदारांकडून प्रवाशांची पळवापळवी !

## *नो पार्किंग झोनमध्ये अवैध ट्रॅव्हल्स सेवा सुरुच...
## * बसस्थानकाबाहेर २०० मीटरवर पार्किंगचा नियम कागदावरच...

●राहुल जुमडे @ रिसोड●

रिसोड बस स्थानक परिसरातील नो पार्किंग झोनमध्ये अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या काळी पिळी, ट्रॅव्हल्समुळे वाहतूक कोंडी वाढली आहे. यासंबंधी अनेक नागरिकांनी तोंडी तक्रारी केल्या असून, तरीही वाहतूक विभाग व प्रादेशिक परिवहन विभाग याकडे दर्लक्ष करत आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार, एसटी बस स्थानक परिसरातील २०० मीटर अंतरावर नो पार्किंग झोन घोषित केले गेले असून, अवैध प्रवासी वाहतूक करणारे वाहन उभे राहू नयेत. परंतु, स्थानिक प्रशासनाचे यावर तात्काळ कारवाई न केल्यामुळे ही परिस्थिती जसाची तशी आहे. बस स्थानक परिसरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी प्रशासनाने योग्य पावले उचलने गरजचे आहे.

रिसोड बस स्थानक परिसरात मालेगाव, वाशिम, संभाजी नगर खाजगी वाहनांचा मोठ्या प्रमाणात उद्रोक झाला आहे त्यातच सायंकाच्या वेळी लागणाऱ्या



मुंबई, नाशिक, पुणे खाजगी बसेस मुळे आता पर्यंत अनेक वाद झाले आहे व पुणे, नाशिक, मुंबई खाजगी बस उभ्या राहिल्यावर एस टी बसला बस स्थानक मध्ये प्रवेश करताना मोठा अडचणीचा सामना करावा लागत आहे.रिसोड बस स्थानक अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे ह्या आदेशाची पायमल्ली होत असल्याचे दिसून येते आहे.

खासगी प्रवासी दलालासह वाहतूकदारांकडून थेट बसस्थानकातून प्रवासी पळविले जात आहे. तसेच खासगी प्रवासी



वाहतूकदारांच्या मुजोरीला आळा घालण्यास बसस्थानक परिसरा बाहेरील परिसरात २०० मीटर अंतरावर कोणतीही खासगी प्रवासी वाहने उभी करू नये आदेश देण्यात आले आहेत.

या आदेशाचे पालन न झाल्याने संबंधितांवर कारवाईचे आदेश देण्यात आलेले आहे. असे असताना कोणत्याही कारवाईची भीती न बाळगता तसेच अधिकाऱ्यांच्या कारवाईस न घाबरता बसस्थानकाबाहेर वाहने, खाजगी बसेस उभ्या करत थेट



बसस्थानकातून प्रवासी नेले जात असल्याची गंभीर बाब समोर आली आहे.प्रवाशांची सुरक्षिततादेखील धोक्यात आली आहे.

विशेष म्हणजे एस.टी. कर्मचार्याच्या समोर बस स्थानक मधून प्रवाशी पळवले जात आहेत त्याविरोधात कोणत्याही प्रकारची कारवाई होत नसल्याने प्रवाशांकडून देखील आश्चर्य व्यक्त केले जात आहे.दिवसेंदिवस याबाबत वाढत्या तक्रारी लक्षात घेता एसटी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कारवाई करण्याची गरज निर्माण झाली आहे.

#### वाहतूक कोंडीत पडतेय भर, अपघातास कारण कोन?

रिसोड बस स्थानक परिसरात रस्त्यावर खासगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या बसेससह अन्य प्रवासी आपले वाहने उभे करतात या मुळे वाहतूक कोंडीत भर पडण्याबरोबर अपघातास देखील कारण ठरत आहे. या प्रकाराकडेही वाहतूक पोलिसांचे दुर्लक्ष होत आहे.

#### लोकल ऑटो चालकांची दबंग गिरी...

रिसोड बस स्थानकावर बाहेरून आलेल्या एस टी बस आल्यावर लोकल ऑटो चक्क एस टी बस मागे बस स्थानक मध्ये जात असताना तसेच ऑटो चालक मागेपुढे न बघता सुसाट वेगाने ऑटो चालवतात एस टी बस स्थानक वर अपघात झाल्यास त्याला जबाबदार कोण ?अनेक ऑटो चालक यांच्यावर कारवाई करण्यात आली असली तरी लोकल ऑटो चालक दबंग गिरी करीत असल्याचे प्रवास्या कडून बोलले जात आहे

### महसूल कर्मचारी संघटना - रिसोड तालुका कार्यकारिणीची बिनविरोध निवड

●सिटी न्युज ब्युरो @ रिसोड●

वाशिम जिल्हा (गट क) महसूल कर्मचारी संघटना, रिसोड तालुका कार्यकारिणीची निवड सभा उत्साहपूर्ण व सौहार्दपूर्ण वातावरणात पार पडली. ही सभा श्री. गजानन देशमुख (महसूल सहाय्यक तथा जिल्हा सचिव, महसूल कर्मचारी संघटना वाशिम) यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

जिल्हाध्यक्ष मा. रवी महाले यांनी तालुका कार्यकारिणी निवडीसाठी श्री. गजानन देशमुख यांना प्राधिकृत केले होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली निवड प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने राबविण्यात आली.

सभेत बोलताना श्री. गजानन देशमुख यांनी संघटनेचे महत्त्व, उद्दिष्टे व जबाबदाऱ्या स्पष्ट करत कर्मचारी एकजुटीवर भर दिला. कर्मचारी हित जपणे हेच संघटनेचे प्रमुख कर्तव्य असल्याचे त्यांनी नमूद केले. मा. सीमा गाडे (महसूल



अधिकारी) यांनी कर्मचाऱ्यांच्या प्रशासकीय अडचणींवर प्रकाश टाकला. तसेच मा. अशोकरावजी डोंगरे (सहायक महसूल अधिकारी) यांनी संघटना बळकट करण्यासाठी पदाधिकाऱ्यांनी राबवायच्या उपक्रमांविषयी मार्गदर्शन केले.

यावेळी शारदा इंगळे यांची अध्यक्षपदी, गजानन कांबळे यांची उपाध्यक्षपदी, सुधाकर पडघान यांची सचिवपदी, प्रताप साबळे यांची संघटकपदी, अनंता रोकडे यांची सहसचिवपदी, बाबुराव मानमोठे यांची कोषाध्यक्षपदी, अशोकरावजी डोंगरे यांची वरिष्ठ मार्गदर्शकपदी तर सीमा गाडे, भारती कांबळे आणि मनीषा घुगे यांची महिला प्रतिनिधी म्हणून सर्वानुमते व बिनविरोध निवड करण्यात आली.

# सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

मंगळवार, दि. १७ फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com


# एक झोन सभापती मिळण्यासाठी भाजपचे चारही नगरसेवक चूप का होते



प्रतिनिधी १७ फेब्रुवारी

**अकोला :** पक्षीय बलाबल पाहता चार झोन सभापतींपैकी दोन काँग्रेस व दोन शहर सुधार आघाडी यांना सभापती पद मिळणार आहे. पण, सोमवारी भाजपने एका अतिरिक्त झोन सभापती पदासाठी पुर्व झोन मध्ये असलेल्या प्रभाग क्रमांक ६ चा समावेश थेट पश्चिम झोनमध्ये करत स्थानिक नागरिकांची मोठी अडचण केली आहे. यावेळी भाजपचे गटनेता आणि चार ही नगरसेवक मात्र चुप का होते असा प्रश्न उपस्थित होत आहे.

रामदास पेठ, महाजनी प्लॉट आणि तापडीया नगर भागातील नागरिकांना आता पश्चिम झोन च्या भीम नगर चौकातील कार्यालयात त्यांचे महापालिकेचे व्यवहार करावे लागतील. चार झोन सभापती पदांपैकी पक्षीय बलानुसार भाजपला दोन आणि काँग्रेसला दोन झोन सभापती मिळणार होते. पण, अजून एका झोन सभापतीची लालसा पाहता भाजपने थेट रामदास पेठ प्रभाग क्रमांक सहा अर्थात महाजनी प्लॉट, रामदास पेठ, देशमुख पेठ आणि तापडीया नगर या भागातील नागरिकांचा पुर्व झोन बदल थेट पश्चिम झोन मध्ये समावेश केला. त्यामुळे या भागातील नागरिकांना त्यांचे महापालिकेच्या संबंधी सर्व कामांसाठी थेट पश्चिम झोन च्या भीम नगर चौकातील कार्यालयात चकरा माराव्या लागतील. यापुर्वी या भागातील नागरिक हे रतनलाल प्लॉट स्थित पंधरा क्रमांकाच्या शाळेतील महापालिका कार्यालयात संपर्क करत होते. त्यांना आता थेट जुने शहरातील भीम नगर चौक गाठत महापालिकेच्या पश्चिम झोन मध्ये जावे लागेल. या विषयावर विरोधकांनी मतदानाची मागणी केली तर सत्तारुढ दोन ते तीन सदस्यांनी शहर सुधार आघाडीला धक्का दिल्याचे चित्र होते.

## विरोधकांच्या आरोपांवर महापौर शारदा खेडकर यांची मात्र चुप्पी

### ♦ सत्तेतून पैसा आणि पैशातून सत्ता भाजपचा गेम प्लॅन झाला उघड

प्रतिनिधी १७ फेब्रुवारी

**अकोला :** सत्तेतून पैसा आणि पैशातून सत्ता असा खेळ महापालिकेत सुरु झाला आहे. कचरा आणि स्वच्छतेची कामे ठेका पध्दतीने देण्यासाठी आणि त्यातून मलिदा प्राप्त करण्यासाठी भाजप नेते अग्रेसर असल्याचे चित्र महासभेत होते. या विषयी विरोधकांनी भाजपवर गंभीर आरोप केले असून महापौर शारदा खेडकर यांनी सिटी न्यूज सुपरफास्टला कुठलीही प्रतिक्रिया या विषयावर दिली नाही.

भाजप च्या ३८ नगरसेवकांसह पाठिंबा देणाऱ्या सात नगरसेवकांच्या प्रभागात पडिक वार्ड पध्दतीने स्वच्छतेची कामे करण्यात येणार आहे. यापुर्वी पडीक वार्डाचे काम हे ९७ हजार प्रति महिना होत असे. आता ते बारा कामगारांसाठी थेट एक लाख ५७ प्रति महिना आणि २० कामगारांसाठी २ लाख ६७ हजार प्रति महिना करण्यास मंजुरी दिली आहे. पण, हे करताना केवळ भाजप आणि सत्तारुढ शहर सुधार आघाडीच्या नगरसेवकांना प्राधान्य दिले आहे. प्रभागात चार नगरसेवक असताना विरोधातील नगरसेवकाला मात्र याचा लाभ मिळणार नाही. असा भेद यात केला गेला आहे. तो नियमाला धरुन नसल्याची ओरड विरोधकांची आहे.

साधारणपणे प्रभागांची रचना करण्याचे अधिकार निवडणूक आयोगाकडे असतात. परंतु, येथे सत्ताधारी पक्षाने प्रशासकीय ठराव करून जी फेररचना केली आहे, त्यावरून 'निवडणूक आयोगाला जे जमले नाही ते सत्ताधाऱ्यांनी केले' अशी टीका होत आहे. पडीक प्रभाग पध्दत ही स्वच्छतेच्या नावावर काही नगरसेवकांची वसुलीचा उद्योग असल्यची टिका विरोधकांनी केली. या विषयावर महापौरांशी सिटी न्यूज सुपरफास्ट ने संपर्क केला असता त्यांनी कुठलीही प्रतिक्रिया दिली नाही. दरम्यान या विषयावर आयुक्तांनी खुलासा करत पडीक वार्डात कसे काम होईल हे सांगितले.

### सत्तारुढ आणि विरोधक हा भेदभाव

महापालिकेच्या स्वच्छतेच्या नियोजनावरून सध्या राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. स्वच्छतेसाठी प्रभागाचे चार भाग पाडण्याच्या नावाखाली सत्ताधारी पक्षाने 'पडीक वॉर्ड' ही संकल्पना कमाईसाठी राबविल्याचा आरोप होत आहे. या रचनेत केवळ सत्ताधारी भाजप आणि त्यांच्या मित्रपक्षाच्या नगरसेवकांच्या प्रभागांचा समावेश करण्यात आल्याने प्रशासकीय वर्तुळात आणि राजकीय क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे. सत्ताधारी पक्षाने आज महासभेत मंजूर केलेल्या ठरावानुसार, ५० सत्ताधारी नगरसेवकांच्या प्रभागात स्वच्छतेसाठी विशेष तरतूद करण्यात आली आहे. स्वच्छतेच्या १२ सफाई कामगारांसाठी १ लाख ६५ हजार रुपयांची तरतूद करण्यात आली. तर २० सफाई कामगार असलेल्या प्रभागातील नगरसेवकाला दरमहा तब्बल २ लाख ६७ हजार रुपये मिळणार आहेत. अशा पडिक वार्डात प्रत्यक्षात कामगारांची नियुक्ती कागदावरच राहते आणि केवळ देयके काढण्यात नगरसेवकांना रस असतो, असा खळबळजनक आरोप विरोधकांनी केला आहे. कंत्राटदाराच्या माध्यमातून प्रत्येक नगरसेवक महिन्याला २ ते ३ लाख रुपये 'वर कमाई' करणार असल्याचे चित्र दिसत आहे. या योजनेत ८० पैकी ५० नगरसेवकांची सोय करण्यात आली आहे, तर विरोधी पक्षाच्या ३० नगरसेवकांच्या प्रभागात केवळ महापालिकेचे नियमित कर्मचारी साफसफाई करतील.

# शिव गौरी विवाह सोहळ्याने डोळ्यांचे पारणे फेडले

## बागेतल्या देवी मंदिरात पार पडला विवाह सोहळा

प्रतिनिधी १७ फेब्रुवारी



**अकोला :** सृष्टीचे तारक शिव गौरी यांचा विवाह सोहळा रविवारी रात्री बागेतल्या देवी मंदिरात अतिशय धुमधडाक्यात पार पडला. मंगलाष्टके झाली. विवाह लागला. उपस्थितांनी शिव गौरींचा जयजयकार केला. फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली. अतिशय देखणे आयोजन करण्यात आले होते. शिव भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

शनिवारी दुपार पासून विवाहातील विधी सुरू झाले. हळद, मेंदी आदी सोपस्कार अतिशय उत्साहाने पार पडले. महिला पुरुष व-हाडी म्हणून प्रत्येक कार्यक्रम साजेसा होईल याकडे लक्ष ठेवून होते. महाशिवरात्री शिव गौरीचा विवाहाचा दिवस. रविवारी दुपारी श्री राजराजेश्वर मंदिरातून भोलेनाथाची वरात निघाली. एका प्रतिकात्मक नंदीवर श्री शिव विराजमान झाले होते. अकोला करार मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सुंदर देखावे वरातीत सहभागी होते. लोक कलावंतांनी तांडव नृत्यासह अग्नीच्या कड्या भोवतीचे थरारक नृत्य सादर करून रंगत आणली. रात्री ९ वाजता वरात बागेतल्या देवी मंदिरात पोहोचली. आणि साडे नऊ वाजताच्या सुमारास मंगलाष्टके झाली. शिव गौरी विवाह लागला. मंडपासह विविध प्रकारच्या व्यवस्था आयोजकांनी केल्या होत्या. शिव गौरी विवाह समितीचे संदीप जोशी आणि सहका-यांचा आयोजनात सहभाग होता.



# देशमुख महिला मंडळाकडून शाळेसाठी लेझिम संचाची भेट

प्रतिनिधी १७ फेब्रुवारी



**अकोला :** विद्यार्थ्यांच्या शारीरिक व सांस्कृतिक विकासाला चालना देण्यासाठी देशमुख महिला मंडळाच्या वतीने प्रेरणादायी सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. मंडळाच्या अध्यक्षा सौ. राजश्रीताई देशमुख यांच्या नेतृत्वाखाली पीएम श्री मनपा सेमी इंग्रजी मुलांची शाळा क्र. ७ या शाळेला सुमारे पाच हजार रुपयांचा लेझिम संच भेट देण्यात आला.

रामदास पेठ येथील शाळेत आयोजित कार्यक्रमात नगरसेवक आशिष पवित्रकार, मनपा शिक्षणाधिकारी हरीशचंद्र इटकर, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष भीमराव डोंगरे व उपाध्यक्ष राजेश गावंडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. मान्यवरांच्या हस्ते लेझिम संचाचे औपचारिक प्रदान करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी देशमुख महिला मंडळाच्या या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक केले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा प्रकारचे योगदान महत्त्वाचे ठरते, असे मतत्यांनी व्यक्त केले. लेझिमहा महाराष्ट्राचा पारंपरिक व्यायाम प्रकार असून तो विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, एकाग्रता, संघभावना आणि शारीरिक तंदुरुस्ती वाढविण्यास उपयुक्त ठरतो. नव्याने उपलब्ध झालेल्या साहित्यामुळे शाळेतील विद्यार्थ्यांना नियमित सरावाची संधी मिळणार आहे. या उपक्रमासाठी मंडळाच्या उपाध्यक्षा सौ. नयनाताई देशमुख, सचिव सौ. स्वप्नाली देशमुख, कोषाध्यक्ष सौ. प्रतिभाताई देशमुख, सह-कोषाध्यक्ष सौ. सीमाताई देशमुख, जेष्ठ सल्लागार सौ. कविताताई ढोरे तसेच माजी अध्यक्षा सौ. कल्पनाताई देशमुख यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नयना गोटे यांनी केले, तर आभार प्रदर्शन सौ. अनिता नवलकर यांनी मानले.


# नाईक होमिओपॅथीमध्ये होतोय असाध्य आजारांवर उपचार

प्रतिनिधी १७ फेब्रुवारी

### ♦ ॲडव्हान्स होमिओपॅथी ट्रीटमेंट रुग्णांसाठी फायदेशीर

**अकोला :** येथील प्रसिद्ध डॉ. नाईक होमिओपॅथीमध्ये थायरॉईड, लठ्ठपणा, ॲसिडिटी, गुडघेदुखी, कंबरदुखी, संधिवात , मायग्रेन सारख्या असाध्य आजारांवर उपचार घेऊन रुग्ण आता निरोगी जीवन जगत आहेत. ॲडव्हान्स होमिओपॅथीच्या उपचारामुळे आतापर्यंत हजारो रुग्णांना मोठा फायदा झाला आहे.

गेल्या ४० वर्षांपासून डॉ. नाईक होमिओपॅथीमध्ये शरीराच्या सर्व आजारांवर संपूर्ण आणि यशस्वी उपचार केले जात आहेत. ज्या रुग्णांना इतर ठिकाणी उपचार घेऊनही फरक पडलेला नाही, अशा रुग्णांनी एकदा येथे नक्कीच भेट दिली पाहिजे.अधिक माहितीसाठी रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक ९१७५९५७१२९ किंवा ९१३००१६१२९ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधू शकतात,




तसेच Naikhomoeopathy.com (Youtube) वर अधिक माहिती मिळवू शकतात. येथे उपचार घेऊन पूर्णपणे बऱ्या झालेल्या एका महिला रुग्णाने आपला अनुभव व्यक्त केला आहे.निकिता नावाच्या या महिला रुग्णाने सांगितले की, त्यांचे वजन अचानक वाढले होते आणि संपूर्ण शरीरावर सूज आली होती. त्यांना सतत अंगदुखीचा त्रास सहन करावा लागत होता. मात्र, येथे उपचार घेतल्यानंतर त्यांचे वजन १० किलोने कमी झाले आहे आणि शरीरावरील सूजही पूर्णपणे निघून गेली आहे. डॉ. नाईक हॉस्पिटलमध्ये उपचार घेतल्यानंतर त्या आता स्वतःला पूर्णपणे निरोगी आणि उत्साही मानत आहेत.येथील एका रुग्णाला दिड वर्षाअगोदर थायरॉईड चा त्रास होत. शरीरावर, गळ्याभोवती सुज होती. वजन वाढले होते. नाईक होमिओपॅथी येथे उपचार सुरू केला असता. माझे वजन १० किलो कमी झाले, गळ्याभोवती व मानेवरची सुज कमी झाली. फ्रेश वाटायला लागले. चिडचिड कमी झाला होता. मला एकंदरीत खुप फायदा झाला.







शिवाजी पार्क मध्ये शिवजयंती उत्सवाची तयारी अंतिम टप्प्यात आहे. परिसरात रंगरंगोटी, छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचे सुशोभीकरण तसेच अन्य तयारी सुरु आहे. या ठिकाणी प्रदर्शन आयोजित करण्यात येत आहे. शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने तयारी केली जात आहे.

# 20 लाखांच्या खंडणीसाठी तरुणाचे अपहरण

प्रतिनिधी १७ फेब्रुवारी

**अकोला :** जळगावमधून २० लाख रुपयांच्या खंडणीसाठी एका १९ वर्षीय तरुणाचे अपहरण करणाऱ्या दोन आरोपींना अकोला पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. पोलिसांनी केवळ आरोपींना अटकच केली नाही, तर अपहरण झालेल्या तरुणाची त्यांच्या तावडीतून सुखरूप सुटका देखील केली आहे. १६ फेब्रुवारी रोजी पहाटे ५:३० वाजेच्या सुमारास, जळगाव स्थानिक गुन्हे शाखेने अकोला स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शंकर शेळके यांना फोनवरून एक महत्त्वाची माहिती दिली. जळगावमधील शनिपेठ भागात राहणाऱ्या १९ वर्षीय गणपत लाल घेवरा राम माळी या तरुणाचे यश जितेंद्र माकोडे आणि दर्शन कैलास गवळी या दोघांनी २० लाख रुपयांच्या खंडणीसाठी अपहरण केले होते. हे दोन्ही आरोपीदेखील जळगावच्या शनिपेठ परिसरातीलच रहिवासी आहेत. या आरोपींचे लोकेशन अकोला शहरात येत असल्याचे समजताच जळगाव पोलिसांनी मदतीचे आवाहन केले.


## CLASSIFIED

**फ्लैट फ्लैट फ्लैट**

नवीन कंस्ट्रक्शन रेडी टू मूव फ्लैट
अमरावतीच्या मधोमध तेही आपल्या बजट मधे फक्त १६,९९,९९९/- मधे नवीन बांधकाम मधे फ्लैट
पत्ता:- देसाई लेआउट ,गणेश कॉलोनी जवळ राजापेठ, अमरावती
अधिक माहिती साठी संपर्क
मो. 8468872250 8788432278

**प्लाट प्लाट प्लाट**

नवीन लेआउट तपस्या नगरी
फक्त २,५०,०००/- च्या ३ सोप्या किस्ती ११ महिने मुदत मधे प्लाट
पत्ता :- मौजे मालेगाव , हनुमानगडी समोर , छत्री तलाव रोड दस्तुर नगर अमरावती
अधिक माहिती साठी संपर्क
मो. 8263923606 7757905649

**कंपनी काम के लिय अनुभवी सेल्समन चाहिये**

-:संपर्क :-
सियाराम मार्केटिंग
होमअप्लांर्स गिफ्ट आर्टिकल
चित्रा टॉकीज के पास अमरावती
हमारे यह शादी, बर्थडे एवम सभी प्रसंग के लिय ठोक भाव रिटन गिफ्ट मिलते है!
9422956859
9422733033
9657901854

**भाड्याने देणे आहे**

२५X ६० चा हॉल व अट्याच दोन वॉशप आहे
पत्ता : गिरीनगर आप्पा दुध डेअरी जवळ, जुना RTO ऑफीस रोड, अकोला (आप्पा दुध डेअरीच्या बाजूला)
मो. 9922670850 9309379112


# 'क्राउन्स अँड रूट्स – ॲडव्हान्स्ड डेंटल केअर'चे भव्य उद्घाटन

प्रतिनिधी १७ फेब्रुवारी

### ♦ आमदार साजिद खान पठाण यांच्या हस्ते फित कापून उद्घाटन



**अकोला :** 'जिथे हास्याची सुरुवात होते, तिथे मजबूती कायम राहते...' या ब्रीदवाक्यासह अकोला शहरातील दीपक चौक येथील महेरा हाईट्स मध्ये 'क्राउन्स अँड रूट्स – ॲडव्हान्स्ड डेंटल केअर' या अद्ययावत दंत चिकित्सालयाचा भव्य उद्घाटन सोहळा नुकताच पार पडला. या कार्यक्रमाला शहरातील मान्यवर, नामांकित डॉक्टर आणि स्थानिक नागरिकांची मोठी उपस्थिती होती.

दीपक चौक येथील महेरा हाईट्स मध्ये 'क्राउन्स अँड रूट्स – ॲडव्हान्स्ड डेंटल केअर' चे उदघाटन सोहळा संपन्न झाला.कार्यक्रमाचे मुख्य अतिथी अकोला पश्चिमचे आमदार साजिद खान पठाण यांच्या हस्ते फित कापून क्लिनिकचे विधिवत उद्घाटन करण्यात आले. यावेळी प्रमुख उपस्थितीमध्ये नगरसेविका निलोफर खान सोहेल खान, नगरसेवक शेख अब्दुल्लाह शेख सलीम, नगरसेवक अब्दुल सलाम खान अब्दुल करीम खान आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना आमदार साजिद खान पठाण यांनी आधुनिक दंत-वैद्यकीय सुविधांचे कौतुक केले. ते म्हणाले, 'अशा प्रकारचे प्रगत क्लिनिक शहरवासीयांना दर्जेदार आणि प्रगत उपचार मिळवून देण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावतात.

क्लिनिकचे संचालक डॉ. मेहबूब रजा खान आणि डॉ. अहझाम शेख खान यांनी सर्व पाहुण्यांचे स्वागत केले. हे दोन्ही तज्ज्ञ प्रोस्थोडॉन्टिस्टआहेत.या क्लिनिकमध्ये दातांच्या मूलभूत उपचारांपासून ते प्रगत उपचारांपर्यंत सर्व सुविधा उपलब्ध आहेत. यामध्ये प्रामुख्याने मॅक्सिलो फेशियल प्रोस्थेटिक्स अर्थात कृत्रिम डोळे, कृत्रिम कान, तोंडाच्या आतील कृत्रिम जबडे यांसारख्या अत्याधुनिक सुविधा उपलब्ध आहे. त्याच बरोबर अ?डव्हान्स्ड केअर अंतर्गत क्राउन, ब्रिज, डेंचर (कवळी) आणि डेंटल इम्प्लांट्सची सोय आहे. दातांच्या सौंदर्यासोबतच त्यांच्या मजबुतीवर विशेष भर दिला जाणार आहे.या सोहळ्याला शहरातील अनेक मान्यवरांनी हजेरी लावली, ज्यात बादशाह शेख (निवृत्त डेप्युटी कमिशनर) आणि कुटुंबिय, डॉ. रहमान खान आणि डॉ. शहनाज खान (खान हॉस्पिटल), एहसान खान (क्वालिटी बिल्डर्स), मुनज्झा खान (क्वीन्स बुटीक), आर्किटेक्ट सोहेल खान (क्वालिटी आर्किटेक्ट्स), आर्किटेक्ट गुलफाम शेख, इंजिनिअर बहराम शेख, इंजिनिअर आकीब खान, तज्ज्ञ डॉक्टर: डॉ. अफाक सिद्दीकी (नेत्ररोग तज्ज्ञ), डॉ. शादाब जाफरी (अस्थिरोग तज्ज्ञ), डॉ. मुब्रम शेख (ॲनेस्थेटिस्ट), फैसल खान, अफसर खान (केनवुड सॉ मिल) यांची उपस्थिती होती. समारंभादरम्यान उपस्थित सर्वांनी डॉ. मेहबूब रजा खान आणि डॉ. अहझाम शेख खान यांना त्यांच्या या नवीन उपक्रमासाठी शुभेच्छा दिल्या. अधिक माहितीसाठी दंतरोग्यांनी ८०७७५६००७७ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात येत आहे.


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135